| English | Marathi |
|---|---|
| Aatmanirbhar Bharat | आत्मनिर्भर भारत |
| Guidelines for Implementation of PM Formalisation of Micro Food Processing Enterprises Scheme (PM FME Scheme) | प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया एण्टरप्राईज योजनेच्या औपचारिकतेची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे (पीऍम एफएमई योजना) |
| Registration | नोंदणी |
| Handholding Support | हॅण्डहोल्डींग सपोर्ट |
| DPR and FUPs | डीपीआर आणि एफयुपी |
| Application for the Subsidy | अनुदानासाठी अर्ज |
| Banking Linkages | बँकींग लिंकेजिस |
| Technological Upgradation | तांत्रिक विस्तार |
| Support to FPOs/SHGs/Cooperatives | एफपीओ/स्वयं सहाय्य गट/सहकाऱ्यांसाठी साहाय्य |
| Common Facilities | सामान्य सुविधा |
| Branding & Marketing | ब्रँडींग आणि विपणन |
| Vocal for Local | वोकल फॉर लोकल |
| Ministry of Food Processing Industries<br>Government of India | अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय<br>भारत सरकार |
| Panchsheel Bhawan, August Kranti Marg, New Delhi-110049<br>Website: www.mofpi.nic.in | पंचशील भवन, ऑगस्ट क्रांति मार्ग, नवी दिल्ली-110049<br>संकेतस्थळः www.mofpi.nic.in |

| Table of Contents | मजकूर तक्ता | |
|---|---|---|
| 1.0 Background | 1.0 पार्श्वभूमी | 06 |
| 2.0 One District One Product | 2.0 एक जिल्हा एक उत्पाद | 08 |
| 3.0 Programme Contents | 3.0 कार्यक्रम घटक | 10 |
| 4.0 Individual Category | 4.0 वैयक्तिक वर्गवारी | 10 |
| 5.0 Group Category | 5.0 गट वर्गवारी | 12 |
| 6.0 Support for Common Infrastructure | 6.0 सामान्य साधन सुविधेसाठी साहाय्य | 15 |
| 7.0 Branding and Marketing Support | 7.0 ब्रँडींग आणि विपणन साहाय्य | 16 |
| 8.0 Capacity Building & Research | 8.0 क्षमता निर्माण आणि संशोधन | 19 |
| 9.0 Institutional Architecture | 9.0 संस्थात्मक बांधणी | 24 |
| 10.0 Studies & Reports | 10.0 अभ्यास आणि अहवाल | 40 |
| 11.0 Project Implementation Plan (PIP) | 11.0 प्रकल्प अंमलबजावणी योजना (पीआयपी) | 41 |
| 12.0 Disbursement of Funds | 12.0 निधी वितरण | 43 |
| 13.0 Procedure with Banks for Grant | 13.0 अनुदानासाठी बँकांकडे प्रक्रिया | 00 |
| 14.0 MIS | 14.0 एमआयएस | 47 |
| 15.0 Empanelment of Expert Institutions | 15.0 तज्ञ संस्थांची सूची | 48 |
| 16.0 Convergence Framework | 16.0 अभिसरण संरचना | 48 |

| Abbreviations and Acronyms | संक्षेप आणि परिवर्णी शब्द |
|---|---|
| DPR | डीपीआर |
| Detailed Project Report | सविस्तर प्रकल्प अहवाल |
| DLC | डीएलसी |
| District level Committee | जिल्हा स्तरीय समिती |
| FPI | एफपीआय |
| Food Processing Industry | अन्न प्रक्रिया उद्योग |
| FPO | एफपीओ |
| Farmer Producer Organisation | शेतकरी उत्पादक संस्था |
| FUP | एफयुपी |
| Firm Level Upgradation Plan | फर्म स्तरीय अपग्रेडेशन योजना |
| GOI | जीओआय |
| Government of India | भारत सरकार |
| Formalization of Micro Enterprises | सूक्ष्म ऍण्टरप्राईजचे औपचारीकरण |
| FME | एफऍमई |
| Implementing Agency | अंमलबजावणी करणारी एजन्सी |
| IA | आयए |
| Inter Ministerial Empowered Committee | आतंर मंत्रालयीन सक्षम समिती |
| IMEC | आयएमईसी |
| Indian Institute of Food Processing Technology | भारतीय अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान संस्था |
| IIFPT | आयआयएफपीटी |
| Management Information System | व्यवस्थापन माहिती प्रणाली |
| MIS | एमआयएस |
| Ministry of Food Processing Industries | अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय |
| MOFPI | एमओएफपीआय |

| | |
|---|---|
| Memorundum of Understanding | सामंजस्य करार |
| MoU | एमओयु |
| Ministry of Skill Development and Enterpreneurship | कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय |
| MSDE | एमएसडीई |
| Micro, Small and Medium Enterprise | सूक्ष्म, लघु आणि मध्यम एँण्टरप्राईज |
| MSME | एमएसएमई |
| National Bank for Agriculture and Rural Development | शेती आणि ग्रामीण विकासासाठी राष्ट्रीय बँक |
| NABARD | नाबार्ड |
| National Co-operative Development Corporation | राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ |
| NCDC | एनसीडीसी |
| National Institute for Food Technology Entrepreneurship and Management | राष्ट्रीय अन्न तंत्रज्ञान उद्योजकता आणि व्यवस्थापन संस्था |
| NIFTEM | एनआयएफटीईएम |
| Non-Government Organisations | बिगर-सरकारी संस्था |
| NGO | एनजीओ |
| National Rural Livelihood Mission | राष्ट्रीय ग्रामीण जीवन निर्वाह मिशन |
| NRLM | एनआरएलएम |
| One District One Product | एक जिल्हा एक उत्पादन |
| ODOP | ओडीओपी |
| Project Executive Committee | प्रकल्प कार्यकारी समिती |
| PEC | पीईसी |
| Project Implementation Plan | प्रकल्प अंमलबजावणी योजना |

| | |
|---|---|
| PIP | पीआयपी |
| Project Management Unit | प्रकल्प व्यवस्थापन युनिट |
| PMU | पीएमयु |
| Pradhan Mantri Kishan Smapada Yojana | प्रधानमंत्री किसान संपदा योजना |
| PMKSY | पीएमकेएसव्हाय |
| Research and Development | संशोधन आणि विकास |
| R&D | आर आणि डी |
| Resource Person | संसाधनी व्यक्ती |
| RP | आरपी |
| Schedule Caste | अनुसूची जाती |
| SC | एससी |
| Schedule Tribe | अनुसूची जमाती |
| ST | एसटी |
| Self Help Group | स्वयं साहाय्य गट |
| SHG | एसएचजी |
| Small Industries Development Bank of India | लघु उद्योग विकास बँक ऑफ इंडिया |
| SIDBI | एसआयडीबीआय |
| State Level Approval Committee | राज्य स्तरीय मंजुरी समिती |
| SLAC | एसएलएसी |
| State Nodal Agency | राज्य नोडल एजन्सी |
| SNA | एसएनए |
| State Rural Livelihood Mission | राज्य ग्रामीण जीवन निर्वाह मिशन |
| SRLM | एसआरएलएम |
| Terms of Reference | संदर्भ अटी |
| TOR | टीओआर |
| Union Territory | केंद्रशासित प्रदेश |
| UT | युटी |

## 1.0 पार्श्वभूमी

### 1.1 आढावा

1.1.1 देशातील असंघिटत अन्न प्रक्रिया करणाऱ्या या क्षेत्रात सुमारे 25 लाख अन्न प्रक्रिया उद्योग असून ते नोंदणीकृत नाहीत आणि अनौपचारिक आहेत. केवळ 7% वनस्पती आणि यंत्रामध्ये गुंतवणूक आणि 3% थकीत क्रेडीट असणाऱ्या असंघिटत उद्योगांचे 74% रोजगार (ज्यातील एक तृतीयांश महीला), 12% उत्पादन आणि अन्न प्रक्रियेमध्ये 27% मूल्यवर्धित आहेत. यापैकी जवळपास 66% युनिट्स ग्रामीण भागात आणि त्यातील 80% कुटुंब-आधारित ऍण्टरप्राईजेस आहेत. यातील बहुतेक युनिट्स वनस्पती व यंत्रसामग्री व उलाढालीतील गुंतवणूकीच्या दृष्टीने सूक्ष्म उत्पादनांच्या गटात येतात.

1.1.2 भारतातील असंघिटत अन्न प्रक्रिया उद्योगासमोर अशी आव्हाने आहेत जी त्याच्या विकासाला मर्यादित करतात आणि त्याची कार्यक्षमतेला कमकुवत करतात. या आव्हानांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे: (अ) उत्पादन आणि पॅकेजिंसाठी तंत्रज्ञानाची मर्यादित कौशल्ये आणि उत्पादकता आणि नवकल्पनांचा अभाव; (बी) चांगल्या आरोग्य आणि उत्पादन पद्धतींविषयी मुलभूत जागरूकता नसणे तसेच गुणवत्ता आणि अन्न सुरक्षा नियंत्रण प्रणालिची कमतरता; (सी) ब्रँडिंग आणि विपणन कौशल्यांचा अभाव आणि पुरवठा साखळीसह सामिल होण्यास असमर्थता इ. (डी) भांडवलाची कमतरता आणि कमी बँक क्रेडीट.

1.1.3 असंघटित सूक्ष्म अन्न प्रक्रिया युनिट्स, कौशल्य प्रशिक्षण, उद्योजकता, तंत्रज्ञान, क्रेडीट आणि विपणनासाठी सखोल निधी सहाय्याची आवश्यक आहे, ज्यामुळे राज्य सरकारच्या चांगल्या सहभागासाठी सक्रीय सहभाग आवश्यक आहे. गेल्या दशकात, केंद्र आणि राज्य सरकारांनी शेतकऱ्यांना अन्न प्रक्रिया संस्था

(एफपीओ) आणि स्वयं साहाय्य गटामध्ये (एसएचजी) सुसूत्र करण्यासाठी गहन प्रयत्न केले. स्वयं साहाय्य गटांनी लक्षणीय प्रगती केली असून त्यांचे 97% एनपीए पातळीसह परतफेड रेकॉर्ड सर्वोत्कृष्ट आहे. सरकारने अन्न उत्पादनांसह उत्पादन व सेवा क्षेत्रातील विविध उपक्रम राबविण्यासाठी स्वयं साहाय्य गटांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. तथापि, एफपीओ आणि स्वयं साहाय्य गटांना गुंतवणूक करण्यासाठी आणि त्यांचे कामकाज वाढविण्यासाठी पाठबळ देण्यासाठी काही शासकीय योजना आहेत.

1.1.4 ही योजना एक केंद्र पुरस्कृत योजना आहे जी सूक्ष्म उद्योगांना भेडसावणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आणि या उपक्रमांच्या उन्नती करणास आणि औपचारिकतेसाठी पाठिंबा देण्यासाठी गट आणि सहकारी संस्थांच्या संभाव्यतेच्या टप्प्यासाठी आखलेली आहे.

## 1.2 ध्येय

1.2.1 या योजनेचे ध्येय म्हणजेः

i) अन्न प्रक्रिया उद्योगाच्या असंघटित विभागातील विद्यमान वैयक्तिक सूक्ष्म ऍण्टरप्राईजची स्पर्धात्मकता वाढविणे आणि या क्षेत्राच्या औपचारिकतेस प्रोत्साहन देणे; आणि

ii) त्यांच्या संपूर्ण मूल्य साखळीसह शेतकरी उत्पादक संघटना (एफपीओ), स्वयं साहाय्य गट (एसएचजी) आणि उत्पादक सहकारी यांना साहाय्य करा.

## 1.3 उद्दीष्टे

1.3.1 सूक्ष्म उद्योग सक्षम करण्यासाठी क्षमता वाढविणे अशी या योजनेची उद्दीष्टे आहेतः

i) विद्यमान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजक, एफपीओ, स्वयं साहाय्य गट आणि सहकाऱ्यांद्वारे क्रेडीट प्रवेश वाढविला;

ii) ब्रँडिंग आणि विपणन मजबूत करून संघटित पुरवठा साखळीत एकत्रीकरण;

iii) विद्यमान 2,00,000 उद्योगांना औपचारिक चौकटीत रुपांतर करण्यासाठी समर्थन;

iv) सामान्य सेवा सुविधा, प्रयोगशाळा, स्टोरेज, पॅकेजिंग, विपणन आणि उष्मायन सेवांसारख्या सामान्य सेवांमध्ये प्रवेश वाढविणे;

v) अन्न प्रक्रिया क्षेत्रातील संस्था, संशोधन व प्रशिक्षणांना मजबूत करणे; आणि

vi) व्यावसायिक आणि तांत्रिक मदतीसाठी उद्योगांच्या प्रवेशात वाढ.

### 1.4 खर्च

1.4.1 योजनेमध्ये 2020-21 ते 2024-25 या पाच वर्षांच्या कालावधीत 10,000 कोटी रुपयांपर्यंत नियोजित व्यय आहे. या योजनेंतर्गत येणारा खर्च केंद्र आणि राज्य सरकारांमधील 60:40 प्रमाण, उत्तर पूर्व आणि हिमालयातील राज्यांमधील 90:10 प्रमाण, विधीमंडळासह केंद्रशासित प्रदेशांमधील 60:40 प्रमाण आणि केंद्रशासित प्रदेशांच्या केंद्राकडून 100% मध्ये वाटला जाईल.

### 1.5. कव्हरेज

1.5.1 या योजनेंतर्गत 2,00,000 सूक्ष्म अन्न प्रक्रिया युनिट्सना क्रेडीट पुरवठा अनुदानासाठी थेट मदत केली जाईल. क्षेत्राच्या विकासाला गती देण्यासाठी पुरेशा प्रमाणात आधारभूत सामान्य पायाभूत सुविधा व संस्थात्मक वास्तूंचे समर्थन केले जाईल.

## 2.0 एक जिल्हा एक उत्पाद

**2.1** एक जिल्हा एक उत्पादन (ओडीओपी) योजना इनपुट खरेदी करणे, सामान्य सेवा मिळविणे आणि उत्पादनांच्या निपणनाच्या प्रमाणात फायदा मिळविणे असा दृष्टिकोन स्वीकारते. या योजनेसाठी ओडीओपी मूल्य साखळी विकास आणि साहाय्य पायाभूत सुविधेच्या संरेखनाची

चौकट उपलब्ध करेल. एका जिल्ह्यात ओडीओपी उत्पादनाचे एकापेक्षा जास्त समूह असू शकतात. राज्यात एकापेक्षा जास्त जिल्ह्यांचा समावेश असलेल्या ओडीओपी उत्पादनाचा समूह असू शकतो.

**2.2** राज्य नाशवंत असलेल्या योजनेवर लक्ष केंद्रित करून एका जिल्ह्यासाठी अन्न उत्पादन ओळखेल. राज्य सरकारद्वारे आधारभूत अभ्यास केला जाईल. ओडीओपी उत्पादन एक नाशवंत शेती उत्पादन असेल किंवा धान्य आधारित उत्पादन किंवा एखाद्या जिल्ह्यात आणि त्या संबंधित क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादित केलेले खाद्य उत्पादन असू शकते. अशा उत्पादनांच्या स्पष्टीकरणात्मक यादीमध्ये आंबा, बटाटा, लीची,टोमॅटो, साबुदाणा, किन्नू, भुजिया, पेठा, पापड, लोणची, बाजरी आधारित उत्पादने, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, मांस तसेच जनावरांच्या खाद्यांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त, काही अन्य पारंपरिक आणि नाविन्यपूर्ण उत्पादनांना या योजनेंतर्गत पाठबळ दिले जाऊ शकते. उदाहरणार्थ, मध, आदिवासी भागातील किरकोळ वन उत्पादने जसे हळद, आवळा, हळदी इत्यादी. कचरा कमी करणे, योग्य परख आणि साठवण आणि विपणन कमी करण्याच्या प्रयत्नांसह त्यांच्या प्रक्रियेस शेती उत्पादनांना आधार मिळेल. टाकावूतून टिकाऊसह साहाय्य करणारी नाविन्यपूर्ण उत्पादने देखील या योजनेत पुरविली जातील.

2.3 भांडवलाच्या गुंतवणूकीसाठी विद्यमान वैयक्तिक सूक्ष्म युनिट्सला पाठिंबा देण्याच्या बाबतीत ओडीओपी उत्पादने तयार करणाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. तथापि, अन्य उत्पादने तयार करणाऱ्या विद्यमान युनिट्सना देखील समर्थित केले जाईल. गटांद्वारे भांडवली गुंतवणूकीच्या बाबतीत प्रामुख्याने ओडीओपी उत्पादनांमध्ये गुंतलेल्यांचे समर्थन केले जाईल.

2.4 अशा जिल्ह्यांमधील इतर उत्पादनांवर प्रक्रिया करणाऱ्या गटांना पाठिंबा देणाऱ्या उत्पादनांवरच पुरेशी तांत्रिक, आर्थिक आणि उद्योजकीय ताकदीसह साहाय्य असेल.

2.5 नवीन युनिट्स केवळ व्यक्ती किंवा गटासाठी असले तरी केवळ ओडीओपी उत्पादनांसाठी समर्थित असतील.

2.6 सामान्य पायाभूत सुविधा आणि विपणन आणि ब्रँडिंगसाठी समर्थन केवळ ओडीओपी उत्पादनांसाठी असेल. राज्य किंवा प्रादेशिक स्तरावर विपणन व ब्रँडिंगला पाठिंबा मिळाल्यास ओडीओपी म्हणून उत्पादन नसलेल्या जिल्ह्यांच्या त्याच उत्पादनांचा समावेश केला जाऊ शकतो.

2.7 वाणिज्य विभाग शेती निर्यात धोरणांतर्गत निर्यातीला पाठिंबा देण्यासाठी समूह पध्दतीवर शेती पिकांवर लक्ष केंद्रित करत असून तुलनात्मक लाभ असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये कृषी मंत्रालयाने विशिष्ट कृषी उत्पादनाच्या विकासासाठी समूह पध्दतीवरही लक्ष केंद्रित केले आहे. बऱ्याच राज्यांनी समान समूह आधारित विकास स्वीकारला आहे. योजनेच्या ओडीओपी पध्दतीमुळे सामान्य सुविधा आणि इतर समर्थन सेवा प्रदान करणे सुलभ होते.

## 3.0 **कार्यक्रम घटक**

3.1 कार्यक्रमाच्या क्षेत्रातील गरजा लक्षात घेणारे चार व्यापक घटक आहेत.

i) सूक्ष्म उद्योगांच्या वैयक्तीक आणि गटांना समर्थन;

ii) ब्रँडींग आणि विपणन समर्थन;

iii) संस्था मजबूत करण्यासाठी समर्थन;

iv) प्रबळ प्रकल्प व्यवस्थापन फ्रेमवर्क सुरु करणे.

**3.2 या प्रत्येक घटकाचा तपशील खाली वर्णन केला आहे.**

## 4.0 **वैयक्तिक सूक्ष्म ऍण्टरप्रायईसांना साहाय्य**

4.1 वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया युनिट्सना पात्र प्रकल्प खर्चाच्या 35% पर्यंत क्रेडीट-लिंक्ड भांडवल अनुदान दिले जाईल ज्यात प्रती युनिट कमाल मर्यादा 10 लाख रुपये आहे. लाभार्थींचे योगदान प्रकल्प खर्चाच्या किमान 10% असले पाहिजे जेणेकरुन बँकांकडून कर्ज दिले जाईल.

### 4.2 **योजनेंतर्गत वैयक्तिक सूक्ष्म ऍण्टरप्राईजांसाठी पात्रता निकषः**

i) ऑपरेशनमध्ये विद्यमान सूक्ष्म अन्न प्रक्रिया युनिट्स;

ii) विद्यमान युनिट्स हे ओडीओपी उत्पादनांसाठी एसएलईपीमध्ये ओळखले पाहिजेत किंवा भौतिक सत्यापनावर मार्गदर्शकाने ओळखले पाहिजेत. विद्युत युनिट वापरणाऱ्या या युनिटच्या बाबतीत वीज बिल कार्यरत असेल तरच त्याला समर्थन असेल. इतर युनिट्ससाठी, विद्यमान ऑपरेशन्स, इन्व्हेंटरी, मशिन आणि विक्री हा आधार असेल;

iii)उद्योग समाविष्ट केलेले नसावे आणि 10 पेक्षा कमी कामगारांना कामावर ठेवावे;

iv)जिल्ह्याच्या ओडीओपीमध्ये उत्पादित उत्पादनामध्ये उद्योग प्राधान्याने सामील असावे. इतर सूक्ष्म उद्योगांचा देखील विचार केला जाऊ शकतो;

v)अर्जदाराकडे उद्योगाचा मालकी हक्क असावा;

vi)उद्योगाची मालकी स्थिती मालकीचे / भागीदारी फर्म असू शकते;

vii)अर्जदाराचे वय 18 वर्षापेक्षा जास्त असले पाहिजे आणि किमान आठवी पास शैक्षिणक पात्रता असणे आवश्यक आहे.

viii) एका कुटुंबातील केवळ एक व्यक्ती आर्थिक साहाय्य मिळविण्यासाठी पात्र असेल. यासाठी "कुटुंब" अर्जदार (स्वत:) , जोडीदार आणि मुले यांचा समावेश करू शकते;

ix) प्रकल्प खर्चाच्या 10% आणि औपचारिकरित्या तयार करण्याची आणि बँक कर्ज घेण्याची इच्छा;

x) जागेची किंमत प्रकल्प खर्चामध्ये समाविष्ट करू नये. तयार झालेल्याची किंमत तसेच दीर्घ भाडे किंवा भाड्याने दिले जाणारे काम या प्रकल्पाच्या किंमतीमध्ये समाविष्ट केले जाऊ शकते. प्रकल्पाच्या खर्चामध्ये समाविष्ट असलेल्या वर्कशेडच्या लीज भाड्याने जास्तीत जास्त 3 वर्षांच्या कालावधीसाठी असणे आवश्यक आहे.

### 4.3 वैयक्तिक सूक्ष्म युनिट्ससाठी निवड प्रक्रिया

4.3.1 अस्तित्त्वात असलेल्या युनिट्सची ओळख पटविणे ही दुहेरी आहे. एक जिल्हा एक उत्पादनाच्या दृष्टिकोनावरुन जिल्ह्यातील त्या उत्पादनात गुंतलेल्या युनिट्सला प्राधान्य दिले जाईल. इतर युनिट्स ज्यांना संभाव्यता आहे त्यांना देखील समर्थित केले जाईल.

4.3.2 योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यास इच्छुक असणाऱ्यांकडून युनिट्सच्या चालू तत्वावर जिल्हा पातळीवर अर्ज मागिवण्यात येतील. मार्गदर्शक व्यक्ती (आरपी) विविध समूहाचे सर्वेक्षण करतील आणि योजनेंतर्गत लाभ मिळविण्याची क्षमता दर्शविणारे युनिट्स ओळखतील. थेट प्राप्त झालेल्या अर्जांसाठी आरपी क्षेत्राची पडताळणी करतील आणि त्यांच्या संभाव्यतेचे मूल्यांकन करण्यासाठी योग्य ते प्रयत्न करतील.

4.3.3. आरपीद्वारे थेट ओळखलेल्या युनिटच्या आधारित आणि प्राप्त अर्ज सर्व संभाव्य प्रकरणे जिल्हास्तरीय समितीसमोर सादर केली जातील. जिल्हास्तरीय समितीने प्रत्येक युनिटसाठी आरपीने सादर केलेल्या अहवालाचा अभ्यास करून इच्छुक व्यक्तींची मुलाखत घ्यावी.

4.3.4 आरपीद्वारे प्रत्येक युनिटसाठी घेतलेल्या परिश्रमांत पुढील तपशील असणे आवश्यक आहे:

i) ऍण्टरप्राईजची वार्षिक उलाढाल;

ii) ऍण्टरप्राईजद्वारे देय रकमेचा मागोवा;

iii)विद्यमान पायाभूत सुविधा;

iv)मागास आणि अग्रेषित लिंकेजीस;

v) समूहांमध्ये निकटता;

vi) ऍण्टरप्राईजचे विपणन लिंकेजीस.

4.3.5 जिल्हास्तरीय समिती / एसएनएने शिफारस केलेल्या प्रकरणांसाठी आरपींनी युनिटच्या श्रेणी सुधारणासाठी बँक कर्ज घेण्यासाठी डीपीआर तयार करण्यास त्यांना मदत करावी. कर्ज मंजूर करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह डीपीआर बँकांना सादर करावेत.

4.4 ओडीओपी बेसलाईन अभ्यासाने अशा नवीन गुंतवणुकींसाठी आवश्यकतेची / संभाव्यतेची तरतूद केल्याने वर नमूद केलेली प्रक्रिया नवीन युनिट्सच्या निवडीसाठी देखील लागू होईल.

4.5 सरकारांनी डीएलसी किंवा एसएनए स्तरावर कोणत्या सूक्ष्म युनिटच्या समर्थनासाठी यादी निश्चित करावीशी वाटते ते ठरवावे. तसेच गट, सामान्य पायाभूत सुविधा व विपणन व ब्रँडींगद्वारे भांडवलीच्या गुंतवणूकीसाठी अर्जांनी डीएलसी / एसएनएची भूमिका निश्चित करावी.

## 5.0 गट वर्गवारी

5.1ही योजना एफपीओ / स्वयं साहाय्य गट / उत्पादक सहकारी अशा समूह आणि गटांना आधार देईल ज्यात क्रमवारी लावणे, वर्गीकरण करणे, भांडार करणे, साठविणे, सामान्य प्रक्रिया, पॅकेजिंग, विपणन, शेती उत्पादनांची प्रक्रिया करणे आणि प्रयोगशाळेची चाचणी करणे यांचा समावेश आहे.

### 5.2 शेतकरी उत्पादक संघटना (एफपीओ) / उत्पादक सहकारी

5.2.1 एफपीओ आणि उत्पादक सहकाऱ्यांना खालील सहकार्य दिले जाईल:

i)35% क्रेडिट लिंकेजसह अनुदान ,

ii)प्रशिक्षण समर्थन;

iii)अशा परिस्थितीत अनुदानाची अधिकतम मर्यादा विहीत प्रमाणे असेल.

**5.2.2 सहकारी / एफपीओसाठी पात्रता निकषः**

i)हे शक्यतो ओडीओपी उत्पादनांच्या प्रक्रियेत गुंतले पाहिजे;

ii)त्यात किमान 1 कोटी रुपयांची उलाढाल असली पाहिजे;

iii)प्रस्तावित प्रकल्पाची किंमत सद्याच्या उलाढालीपेक्षा मोठी नसावी;

iv)सदस्यांकडे उत्पादनास कमीत कमी 3 वर्षासाठी व्यवहार करण्यासाठी पुरेसे ज्ञान आणि अनुभव असावा.

v)सहकारी / एफपीओकडे कामाच्या भांडवलाच्या 10% आणि मार्जिन पैशाची पूर्तता करण्यासाठी राज्य सरकारकडून पुरेशी अंतर्गत स्त्रोत किंवा मंजूरी असावी;

**5.3 स्वयं साहाय्य गट (एसएचजी)**

5.3.1 असंख्य स्वयं साहाय्य गट अन्न प्रक्रिया उपक्रम राबिवत आहेत. स्वयं साहाय्य गटांना खालील साहाय्य पुरवण्याचा प्रस्ताव या योजनेत आहे: -

**5.3.2 बीज भांडवल:**

i) योजनेअंतर्गत स्वयं साहाय्य भांडवलाच्या प्रत्येक सदस्याला रु. 40,000/- कार्य भांडवल आणि लहान साधनांच्या खरेदीसाठी बीज भांडवल प्रदान केले जाईल;

ii)बीज भांडवल देताना ओडीओपी उत्पादनांमध्ये गुंतलेल्या स्वयं साहाय्य गटांना प्राधान्य दिले जाईल;

iii)स्वयं साहाय्य गटातील सर्व सदस्य अन्न प्रक्रियेत सामील होऊ शकत नाहीत. म्हणून स्वयं साहाय्य गटांच्या फेडरेशन स्तरावर बीज भांडवल दिले जाईल;

iv)एसएनए / एसआरएलएमकडून स्वयं साहाय्य गट फेडरेशनला अनुदान म्हणून देण्यात येईल. स्वयं साहाय्य गट फेडरेशन ही रक्कम स्वयं साहाय्य गटांच्या सदस्यांना स्वयं साहाय्य गटांना परतफेड करण्यासाठी कर्ज म्हणून देईल.

5.3.3 **स्वयं सहाय्य गटातील प्रत्येक सदस्याला साहाय्य** म्हणून अन्न प्रक्रिया उद्योगाचा एकल युनिट म्हणून 35% क्रेडीट लिंक्ड अनुदान अधिकतम रक्कम 10 लाख रुपये आहे.

5.3.4 स्वयं साहाय्य गट पातळीवरील फेडरेशनमध्ये **भांडवल गुंतवणूकीसाठी साहाय्य**, 35% क्रेडिट लिंक्ड अनुदान. अशा प्रकरणात अनुदानाची जास्तीत जास्त मर्यादा विहीत प्रमाणे असेल.

5.3.5 **स्वयं साहाय्य गटांना प्रशिक्षण आणि हॅण्डहोल्डींग सपोर्ट** स्वयं साहाय्य गटांना पाठिंबा देण्यासाठी राज्य ग्रामीण आजीविका मिशनसह (एसआरएलएम) मोठ्या संख्येने प्रशिक्षीत मार्गदर्शक व्यक्ती उपलब्ध आहेत. एसआरएलएमच्या या स्थानिक मार्गदर्शक व्यक्तींचा शेती उत्पादनांमध्ये कौशल्य असणाऱ्यांना प्रशिक्षण, युनिट्सची श्रेणी सुधारणा, डीपीआर तयार करणे, हण्डहोल्डिंग समर्थन इ.

5.3.6 **स्वयं साहाय्य गटांना बीज भांडवलासाठी पात्रता निकषः**

i)सद्या अन्न प्रक्रियेत गुंतलेलेच स्वयं साहाय्य गट सदस्य पात्र ठरतील;

ii)स्वयं साहाय्य गट सदस्याने या रकमेचा वापर कार्यरत भांडवलासाठी आणि लहान साधनांच्या खरेदीसाठी करण्याचे वचन दिले आहे आणि स्वयं साहाय्य गट फेडरेशनला या संदर्भात वचनबद्धता दर्शिवली पाहिजे;

iii)बियाणे भांडवल देण्यापूर्वी एसएचजी फेडरेशनने प्रत्येक सदस्यासाठी खालील मूलभूत माहिती गोळा केली पाहिजे:

a)उत्पादित प्रक्रियेचा तपशील;

b)हाती घेतलेले इतर उपक्रम;

c)वार्षिक उलाढाल;

d)कच्चा माल आणि उत्पादनांचे विपणन स्त्रोत.

5.3.7 **स्वंय साहाय्य गटांकरीता भांडवली गुंतवणूकीसाठी क्रेडीट लिंक्ड अनुदानासाठी पात्रता निकषः**

i)प्रकल्प खर्चाच्या 10% पूर्ण करण्यासाठी स्वयं साहाय्य गटांकडे पुरेसा स्वत:चा निधी आणि कार्यकारी भांडवलासाठी 20% मार्जिन पैसे किंवा राज्य सरकारकडून अनुदान म्हणून मंजूर करणे आवश्यक आहे;

ii)स्वयं साहाय्य गट सदस्यांकडे ओडीओपी उत्पादनावर प्रक्रिया करण्याचा किमान 3 वर्षांचा अनुभव असावा.

6.0 **सामान्य साधन सुविधांसाठी साहाय्य**

6.1 एफपीओ, स्वयं साहाय्य गट, सहकारी संस्था, कोणतीही सरकारी किंवा खाजगी एजन्सी ऍण्टरप्राईजांना सामान्य पायाभूत सुविधांसाठी साहाय्य दिले जाईल. क्षमतेच्या भरीव भागासाठी भाड्याने घेतलेल्या योजनेनुसार या योजनेत तयार केलेली सामान्य पायाभूत सुविधादेखील इतर युनिट आणि लोकांसाठी उपलब्ध असावीत. या प्रवर्गातील प्रकल्पांची पात्रता मोठ्या प्रमाणात शेतकरी व उद्योगाच्या फायद्यावर, व्यवहार्यतेच्या अंतरांवर, खासगी गुंतवणूकीची अनुपस्थिती, मूल्य साखळीची गंभीरता इत्यादींवर आधारित ठरविली जाईल. क्रेडीट पुरवठा अनुदान 35% उपलब्ध असेल. अशा प्रकरणात अनुदानाची जास्तीत जास्त मर्यादा विहीत प्रमाणे असेल.

6.2.**योजनेअंतर्गत अनुदानित सामान्य साधन सुविधांचे प्रकारः**

योजने अंतर्गत खालील सामान्य पायाभूत सुविधांना निधी साहाय्य दिले जाईल:

i)शेती उत्पादनाचे नुकसान, वर्गीकरण, ग्रेडींग, कोठार आणि शेताच्या गेटवर थंड स्टोरेजची जागा;

ii)ओडीओपी उत्पादनांच्या प्रक्रियेसाठी सामान्य प्रक्रिया सुविधा;

iii)**उष्मायन केंद्र** एक किंवा अधिक उत्पादनांच्या ओळींचा समावेश असावा जे लहान युनिट्सद्वारे भाड्याच्या आधारावर त्यांच्या उत्पादनांच्या प्रक्रियेसाठी वापरल्या जाऊ शकतात. उष्मायन केंद्र अंशतः प्रशिक्षण उद्देशासाठी वापरले जाऊ शकते. ते रन ऑन व्यावसायिक आधारावर असावे.

**6.3 ऍफपीओ/ऍसऍचजी/सहकाऱ्यांव्दारे गटांसाठी सामान्य साधनसुविधा आणि भांडवल गुंतवणूकीसाठी प्रस्ताव पाठविण्याची प्रक्रिया:**

6.3.1. योजने अंतर्गत ऍफपीओ/ऍसऍचजी/सहकारी संस्थेकडून सामान्य साधनसुविधा आणि भांडवल गुंतवणूकीचा निधी मिळविण्यासाठी खालीलप्रमाणे प्रक्रियेचे पालन करावे:

i) भांडवल गुंतवणूक आणि सामान्य साधनसुविधेच्या योजने अंतर्गत साहाय्य मिळविण्यासाठी डीपीआर विहीत नमुन्याप्रमाणे तयार केले जाईल;

ii)डीपीआरात प्रस्तावाची आवश्यक माहिती, प्रकल्प खर्चाचा तपशील, प्रस्तावित मनुष्यबळ, एकंदर उत्पन्न, विपणन चॅनेल, कच्च्या मालाचे स्रोत, अंदाजित लाभ आणि नुकसान खाते, रोख प्रवाह विवरण आणि इत्यादींचा तपशील असेल.

iii) डीपीआर राज्य नोडल एजन्सीकडे पाठवाव. ऍसऍलएसीने प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर ऍसऍनएने प्रस्तावाची शिफारस ऍमओऍफपीआयकडे करावी. 10 लाख रुपयांपेक्षा जास्त अनुदानाला गटाच्या साहाय्यासाठीचा कसलाही प्रस्ताव मान्यतेसाठी ऍमओऍफपीआयकडे पाठवावा.

iv) ऍमओऍफपीआयने प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर कर्ज मंजूरीसाठी प्रस्ताव आर्थिक संस्थेकडे पाठवावा.

v) डीपीआरात गट सदस्यांना प्रशिक्षण कालावधी आणि मॉड्यूलच्या आधारावर प्रशिक्षण साहाय्य आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या किंमतीप्रमाणे यावर आधारित प्रस्ताव असू शकतो. प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षण आणि शक्ती वाढविण्याच्या घटकांना पूर्ण निधी दिला जाईल.

vi) डीपीआर तयार करण्यासाठी ऍफपीओ/ऍसऍचजी/सहकारांना 50,000 रुपये प्रती प्रकरणांप्रमाणे साहाय्य उपलब्ध करेल.

vii) बँकेकडून कर्ज मंजूर झाल्यानंतर अनुदान संवितरण अर्जदार संस्थेच्या बँक खात्यात जमा केले पाहिजे.

## 7.0 ब्रॅण्डींग आणि विपणन साहाय्य

7.1 योजने अंतर्गत विपणन आणि ब्रॅण्डींग सहाय्यता ऍफपीओ/ऍसऍचजी/सहकार गट किंवा सूक्ष्म अन्न प्रक्रिया ऍण्टरप्राईजच्या ऍसपीव्हीक दिले जाईल. ओडीपी पध्दतीनंतर राज्य किंवा प्रादेशिक स्तरावरील उत्पादनाला विपणन आणि ब्रॅण्डींग साहाय्य दिली जाईल.

**7.2 साहाय्यासाठी पात्र नग:-**

i) विपणन संदर्भातल्या प्रशिक्षण योजने अंतर्गत पूर्ण निधी उपलब्ध करेल;

ii) सामान्य पॅकेजिंगमध्ये भाग घेण्यासाठी मानकीकरणासह सामान्य ब्रॅण्ड आणि पॅकेजिंग विकसित करणे;

iii) राष्ट्रीय आणि प्रादेशिक किरकोळ चैन आणि राज्य स्तरीय संस्थेकडे विपणन

iv) उत्पादनाची गुणवत्ता निर्धारित मानकांशी जुळत असल्याचे सुनिश्चित करण्यासाठी गुणवत्ता नियंत्रण.

**7.3** विपणन व ब्रँडिंगला साहाय्य देण्यासाठी समान ब्रँड, समान पॅकेजिंग व उत्पादन प्रमाणीकरण विकसित करणे आवश्यक असते. समान ब्रँडिंग व पॅकेजिंगसाठीची योग्य पातळी ही ठिकाणनिहाय, प्रकरणनिहाय व उत्पादननिहाय वेगवेगळी असेल. ते जिल्हा, प्रादेशिक किंवा राज्यस्तरीय असो, प्रत्येक प्रकरणात संबंधित एॅसएॅनएद्वारे निर्णय घेतला जाईल. म्हणून, विपणन व ब्रँडिंगसाठीच्या साहाय्याचा प्रस्ताव एॅसएॅनएने तयार केला पाहिजे. ब्रँडिंग व विपणनासाठीचे साहाय्य हे एकूण खर्चाच्या 50% पर्यंत मर्यादित असेल. अशा प्रकरणांमधील अनुदानाची कमाल मर्यादा, ही विहित केल्याप्रमाणे असेल. या योजनेंतर्गत, किरकोळ केंद्रे उभारण्यासाठी साहाय्य देण्यात येणार नाही.

**7.4** ओडीओपी फोकससाठी वरील वर्णनाच्या अनुरूप, राष्ट्रीय स्तरावर विशिष्ट उत्पादनांनाही ब्रँडिंग व विपणनासाठी साहाय्य दिले जाऊ शकते. समान ब्रँडिंग/पॅकेजिंग व विपणनासाठी अशा प्रकारचे साहाय्य राष्ट्रीय स्तरावर देण्यात येईल. या साहाय्यासाठीचा प्रस्ताव, राज्यांनी किंवा राष्ट्रीय स्तरावरील संस्थांनी किंवा संघटनांनी किंवा भागीदार संस्थांनी,एॅमओएॅफपीआयकडे पाठविला पाहिजे.

**7.5 पात्रतेचे निकष :**

7.5.1 प्रस्तावांनी पुढील अटी पूर्ण केल्या पाहिजेत :-

i) प्रस्ताव ओडीओपीशी संबंधित असला पाहिजे.

ii) साहाय्यासाठी पात्र ठरणाऱ्या उत्पादनाची किमान उलाढाल रू. 5 कोटी असली पाहिजे.

iii) अंतिम उत्पादन हे किरकोळ पाकिटात ग्राहकाला विकण्यात येणारे असले पाहिजे.

iv) अर्जदार हे अनेक उत्पादकांना एकत्र आणणारे ऍफपीओ/ऍसऍचजी/सहकारी/प्रादेशिक–राज्यस्तरीय ऍसपीव्ही असले पाहिजेत.

v)उत्पादन आणि उत्पादक मोठ्या स्तरावर बदल करण्यास सक्षम असले पाहिजेत;

vi) जाहिरात करणाऱ्या संस्थेची व्यवस्थापन व उद्योजकता क्षमता, प्रस्तावात नमूद केली गेली पाहिजे.

## 7.6 ब्रँडिंग व विपणन अंतर्गत साहाय्यासाठी अर्ज करण्यासाठीची प्रक्रिया

### 7.6.1 **तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करणे:**

i) प्रस्तावासाठीचा डीपीआर तयार केला पाहिजे, ज्यामध्ये प्रकल्प, उत्पादन, धोरण, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादाचे एकत्रीकरण, समान पॅकेजिंग व ब्रँडिंग, किंमतीचे धोरण, प्रसिद्धीचे तपशील, वखार व साठा, विपणनाचे माध्यम, विक्रीत वाढ करण्यासाठीच्या योजना इ. च्या महत्त्वाच्या तपशीलांचा समावेश असला पाहिजे.

ii) विपणन व ब्रँडिंगसाठीच्या प्रस्तावांचा डीपीआर तयार करण्यासाठी, ऍसऍनएकडून रू. 5 लाखापर्यंतचे साहाय्य उपलब्ध असेल.

iii) प्रस्तावामध्ये कच्चा माल खरेदीपासून ते विपणनापर्यंतचे उपक्रम, महत्त्वाचे नियंत्रण बिंदू, गुणवत्ता नियंत्रण निश्चित करणे, प्रसिद्धी उपक्रम, सहभागी उत्पादकांची संख्या वाढविणे व उलाढाल यासंबंधातील पंचवार्षिक योजना यांचा फ्लोचार्टही असला पाहिजे.

7.6.2 सहकारी/ऍसऍचजी/ऍफपीओ/ऍसपीव्ही, अग्रणी खरेदीदार, जर असल्यास, आणि ऍसऍनए यांच्यादरम्यान, व्यवसाय योजनेसहित एक करार केला पाहिजे, ज्यामध्ये उत्पादकांच्या भांडवलाच्या व सेवांच्या गरजा आणि प्रस्तावित सुधारणांचे वर्णन असावे, ज्यामुळे त्यांना

त्यांच्या उत्पादन क्षमता व कौशल्ये वाढवून, बाजारपेठेशी म्हणजेच अग्रणी खरेदीदारांशी असलेली त्यांची सहलग्नता दृढ करण्यात मदत होईल.

## 8.0 क्षमता निर्माण आणि संशोधन

### 8.1 राष्ट्रीय संस्थांना साहाय्य:

8.1.1 क्षमता निर्माण व प्रशिक्षण हे तांत्रिक सुधारणा आणि सूक्ष्म अन्न प्रक्रिया ऍण्टरप्राईजेसच्या स्थापनेमधील महत्त्वाचे घटक आहेत. राष्ट्रीय स्तरावर, राष्ट्रीय अन्न तंत्रज्ञान उद्योजगता व व्यवस्थापन संस्था (ऍनआयऍफटीईएम) आणि भारतीय अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान संस्था(आयआयऍफपीटी) या संस्था, क्षमता निर्माण व संशोधनात महत्त्वाच्या भूमिका बजावतील. संशोधन व क्षमता निर्माणासाठी आर्थिक साहाय्याकरिता त्या पात्र असतील. ऍनआयऍफटीईऍम व आयआयऍफपीटी हे, राज्यस्तरीय तांत्रिक संस्थांच्या सहकार्याने निवडक ऍण्टरप्राईजेसना/गटांना/समूहांना प्रशिक्षण व संशोधन साहाय्य प्रदान करतील. देशभरात विशिष्ट स्तरावर, प्रशिक्षणासाठी व संशोधनासाठी साहाय्य देण्याकरिता, आयसीएआर, सीऍसआयआर यांतर्गत राष्ट्रीय स्तरावरील उत्पादन विशिष्ट संस्था किंवा डीऍफआरऍल व सीऍफटीआरआय यासारख्या प्रमुख संस्था भागीदार संस्था असतील.

8.1.2 **ऍनआयऍफटीईऍम आणि आयआयऍफपीटी पुढील उपक्रम राबवितील:**

i) ऍमओऍफपीआय, राज्य व जिल्हा अधिकाऱ्यांसाठी क्षमता निर्माण व प्रशिक्षण;

ii) अभ्यासक्रम व प्रशिक्षण मॉड्युल्स विकसित करणे आणि सूक्ष्म ऍण्टरप्राईजेसना व समूहांना पुढील प्रशिक्षण देण्यासाठी राज्यस्तरीय तांत्रिक संस्थांशी भागीदारी करणे;

iii) प्रशिक्षकांचे प्रशिक्षण;

iv) प्रशिक्षणासाठी ऑनलाईन मॉड्युल्स विकसित करणे;

v) सूक्ष्म केंद्रांच्या सर्वसाधारण उत्पादनांसाठी मानक तपशीलवार प्रकल्प अहवाल(डीपीआर) तयार करणे;

vi) सर्वसाधारण सूक्ष्म केंद्रांच्या सुधारणांसाठी तंत्रज्ञान/मशिन टप्प्या-टप्प्याने विकसित करणे;

vii) वरील उपक्रमांसाठी, इतर संशोधन व प्रशिक्षण संस्थांशी भागीदारी करणे;

viii) योजनेच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी राज्यस्तरीय तांत्रिक संस्था सशक्त करणे.

8.1.3 ऍनआयऍफटीईऍम आणि आयआयऍफपीटी हे आपल्या संस्थेमध्ये, योजनेसाठी विहित केलेल्या रचनेप्रमाणे पीऍमयू स्थापन करतील. या पीऍमयूसाठी, ते कंत्राटी तत्त्वावर कर्मचारी घेतील. या पीएमयूचा संपूर्ण खर्च भागविण्यासाठी,योजनेंतर्गत ऍनआयऍफटीईऍमला व आयआयऍफपीटीला अनुदान दिले जाईल.

8.1.4 ऍनआयऍफटीईऍमने आणि आयआयऍफपीटीने अर्थसंकल्पासह त्यांनी प्रस्तावित उपक्रमांसाठी प्रकल्प अंमलबजावणी योजना (पीआयपी) तयार करून ऍमओऍफपीआयला सादर केली पाहिजे. ऍमओऍफपीआयमधील क्षमता निर्माण व संशोधन समिती या पीआयपीची तपासणी करेल व त्यासाठी आयऍमईसीकडून मंजुरी घेईल. पीआयपीमध्ये मंजूर केलेल्या उपक्रमांसाठी ऍनआयऍफटीईऍम आणि आयआयऍफपीटीला योजनेंतर्गत, ऍमओऍफपीआयतर्फे निधी साहाय्य देण्यात येईल.

## 8.2 राज्य स्तरीय तांत्रिक संस्थांना साहाय्य

8.2.1 राज्य सरकारने या योजनेसाठी, एक राज्यस्तरीय तांत्रिक संस्था नामनिर्देशित केली पाहिजे. त्यांचे उपक्रम पुढीलप्रमाणे असतील :

i) राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेसाठी पीआयपी तयार करणे;

ii) ऍसऍनएने तयार केलेल्या क्षमता निर्माण व संशोधनासंबंधी पीआयपीला

माहिती प्रदान करणे;

iii) राज्य व जिल्हा अधिकाऱ्यांसाठी क्षमता निर्माण व प्रशिक्षण आयोजित करणे;

iv) जिल्हा संसाधन व्यक्तींसाठी प्रशिक्षण आयोजित करणे;

v) ऍसऍनएने तयार केलेल्या ब्रँडिंग व विपणन योजनांसाठी माहिती प्रदान करणे;

vi) जिल्हा संसाधन व्यक्तींना, सूक्ष्म ऍंटरप्राईजेसना साहाय्य देणे, डीपीआर

तयार करणे इ. साठी सल्ला साहाय्य प्रदान करणे.

8.2.2 नामनिर्देशित राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेने, प्रस्तावित उपक्रमांसाठीच्या वार्षिक प्रशिक्षण कॅलेंडरसह पीआयपी तयार केली पाहिजे आणि ऍनआयऍफटीईऍम व आयआयऍफपीटीशी सल्लामसलत करून, राज्यस्तरीय मंजुरी समितीच्या मंजुरीनंतर ती मंत्रालयाला पाठविली पाहिजे.

8.2.3 **राज्य स्तरीय तांत्रिक संस्थेसाठी निवडीचे निकष:** राज्यस्तरीय तांत्रिक संस्था ही अन्न प्रक्रिया तंत्रज्ञानात कार्यरत असलेली विद्यमान संस्था असली पाहिजे. ही संस्था पुढीलप्रमाणे असू शकते:

i) राज्य कृषी विद्यापीठ किंवा इतर कोणत्याही विद्यापीठांतर्गत एक महाविद्यालय / संस्था;

ii) राज्याच्या मालकीची अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान संशोधन संस्था;

iii) अन्न प्रक्रिया केंद्रस्थानी असलेली सीऍसआयआर अंतर्गत कोणतीही किंवा भारत सरकारची कोणतीही संस्था

iv) ते महाविद्यालय असल्यास, तेथे अन्न प्रक्रिया तंत्रज्ञानातील पदवीपूर्व/पदव्युत्तर अभ्यासक्रम व आवश्यक शिक्षकवर्ग असला पाहिजे.

v) संस्थेत आवश्यक त्या चाचण्यांची व प्रक्रियांची उपकरणे असलेली सुसज्ज प्रयोगशाळा असली पाहिजे.

vi) संस्थेत संशोधन कार्य व उत्पादन विकासाचे कार्य करणारा शिक्षकवर्ग असला पाहिजे आणि विशेषत: ऍमएसऍमईसाठी अन्न प्रक्रियेची मशिनरी असली पाहिजे.

vii) राज्य सरकारने प्रस्तावाची शिफारस केली पाहिजे.

viii) संस्था, एका नोडल अधिकाऱ्याची व समर्पित समूहाची नेमणूक करण्यास तयार असली पाहिजे, ज्यामध्ये फक्त योजनेवर लक्ष केंद्रित करणारे किमान दोन शिक्षकवर्गाचे सदस्य असावेत.

ix) योजनेंतर्गत लाभार्थींना प्रशिक्षण देण्यासाठी, संस्थेकडे पुरेशी अंगभूत जागा असली पाहिजे.

x) राज्यासाठी ओडीओपी अंतर्गत काही उत्पादनांवर प्रक्रिया करण्यासाठी, संस्थेकडे प्राधान्याने पथदर्शी कारखाने असले पाहिजेत.

**8.3 व्यक्तींना/गटांना प्रशिक्षण साहाय्य**

8.3.1 भांडवल गुंतवणुकीसाठी साहाय्य प्रदान करण्यात येणाऱ्या स्वतंत्र युनिट्सना व गटांना प्रशिक्षण साहाय्य देण्यात येईल. याव्यतिरिक्त, ओडीओपी उत्पादनांची प्रक्रिया करणाऱ्या जिल्ह्यातील इतर विद्यमान युनिसट्ना व गटांनाही प्रशिक्षण साहाय्य देण्यात येईल. योजनेंतर्गत विपणन व ब्रँडिंगसाठी साहाय्य दिल्या जाणाऱ्या गटांनाही प्रशिक्षण साहाय्य देण्यात येईल.

8.3.2 कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयातर्फे (एॅमएॅसडीई) प्रशिक्षणावर खर्च करण्यात येणारा, प्रति तास दर ठरविण्यात आला आहे. हाच ठराविक दर योजनेसाठी वापरला जाईल. प्रशिक्षणाची पद्धत व प्रशिक्षणाच्या तासांची संख्या, यासाठी ही विहित नियमांचे पालन केले गेले पाहिजे.

8.3.3 योजनेंतर्गत क्षमता निर्माणासाठी खालील बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे:

i) उद्योजकता विकास, एॅण्टरप्राईज व्यवहारांची आवश्यक कार्ये, विपणन, बूक कीपिंग, नोंदणी, एॅफएॅसएॅसएआय मानके, उद्योग आधार, जीएॅसटी नोंदणी, सर्वसाधारण स्वच्छता इ.

ii) ओडीओपी उत्पादन किंवा युनिटने निर्माण केलेल्या उत्पादनासह आवश्यक मशिन्सचे कार्य, स्वच्छताविषयक बाबी, पॅकेजिंग, साठा, खरेदी, नवीन उत्पादने विकास इ. साठी तयार केलेले विशिष्ट प्रशिक्षण.

### 8.3.4 प्रशिक्षणाचे माध्यम

i) सर्व युनिट्सना लागू असलेल्या सर्वसामान्य प्रशिक्षणासाठी ऑनलाईन मॉड्युल्सचा वापर केला जाईल.

ii) शक्य असेल त्या मर्यादेपर्यंत आरएँसटीईआय भौतिक साधनसुविधा वापरून, जिल्ह्यांना ओडीओपीसाठी उत्पादन विशिष्ट प्रशिक्षण दिले जाईल.

iii) प्रशिक्षण हे आठवडी तत्त्वावर छोट्या मॉड्युल्समध्ये दृक-श्राव्य माध्यम वापरून जिल्ह्यात आयोजित केले पाहिजे, जेणेकरून, विद्यमान व्यवसाय व्यवहारांना कमीत कमी त्रास होईल.

iv) युनिट्सतर्फे खरेदी करण्यात येणाऱ्या मशिन्सवरील काम आणि स्वच्छता व पॅकेजिंगवरील प्रशिक्षण हा प्रशिक्षणाचा महत्त्वाचा घटक असेल. म्हणून, जिल्ह्यात किंवा जिल्ह्याबाहेर ती मशिन्स वापरणाऱ्या अशा लाभार्थीसाठी प्रशिक्षणाचा ठराविक घटक, थोड्या कालावधीसाठी सुरू करण्यात आला आहे.

8.3.5 **हॅण्डहोल्डींग सपोर्ट**: सूक्ष्म अन्न प्रक्रिया एँण्टरप्राईजेसना हॅण्डहोल्डींग सपोर्ट देण्यासाठी जिल्हा/प्रादेशिक स्तरावर संसाधन व्यक्तींना (आरपी) सामावून घेण्याचा योजनेचा विचार आहे. हे आरपी पुढील कार्ये करतील :

i) डीपीआर तयार करणे, बँकेतून कर्ज मिळविणे, प्रशिक्षण, युनिटची श्रेणीसुधारणा करणे, आवश्यक त्या नियमन मंजुरी मिळविणे, स्वच्छता इ. साठी सूक्ष्म एँण्टरप्राईजेसना हॅण्डहोल्डींग सपोर्ट देणे.

ii) पीआयपी व ओडीओपी आणि समूह अभ्यास व गटांचा अभ्यास यासाठी माहिती प्रदान करणे.

iii) स्वतंत्र सूक्ष्म ऍण्टरप्राईजेसना व समूहांना दिल्या जाणाऱ्या अनुदान व बीज भांडवलासाठीच्या अर्जांची व समान सुविधांची निवड करणे व त्यांची सोय करणे.

## 9.0 संस्थात्मक बांधणी

9.1 योजनेसाठी सर्व प्रशासकीय स्तरावर एक मजबूत संस्थात्मक बांधणी तयार करण्यात येईल. योजनेच्या अंमलबजावणीसाठी व त्याच्या प्रगतीवर देखरेख ठेवण्यासाठी राष्ट्रीय, राज्य व जिल्हा (धोरणाच्या मार्गदर्शनासाठी) पातळीवर समित्या असतील. या समित्या, ऍमओऍफपीआयच्या राष्ट्रीय कार्यक्रम विभागाच्या आणि राज्य नोडल एजन्सीच्या कारभाराचे पर्यवेक्षण करतील. याव्यतिरिक्त, ऍमओऍफपीआयच्या राष्ट्रीय कार्यक्रम विभागाला आणि राज्य नोडल एजन्सीला साहाय्य करण्यासाठी, पूर्णकालिक तत्त्वावर सामावून घेतलेल्या सल्लागारांचा व तज्ज्ञांचा समावेश असलेले पीएमयू स्थापन करण्यात येतील. संस्थात्मक संरचना खालील आकृतीत स्पष्ट केली आहे आणि खालील विभागात त्याचे वर्णन करण्यात आले आहे.

**आकृती 1: संस्थात्मक बांधणी**

| English | Marathi |
|---|---|
| Inter-Ministerial Committee (IMEC) MoFPI (National Programme Division) | आंतर-मंत्रालयीन समिती (आयऍमईसी) ऍमओऍफपीआय (राष्ट्रीय कार्यक्रम विभाग) |
| Project Executive Committee (PEC) | प्रकल्प कार्यकारी समिती (पीईसी) |
| Committee on Capacity Building and Research | क्षमता निर्माण व संशोधनावरील समिती |
| National Programme Management Unit (NPMU) | राष्ट्रीय कार्यक्रम व्यवस्थापन युनिट (ऍनपीऍमयू) |
| National Apex Institutions NIFTEM/IIFTPTetc. | राष्ट्रीय सर्वोच्च संस्था ऍनआयऍफटीईऍम/आयआयऍफटीपीटी इ. |

| | |
|---|---|
| State Level Technical Institutions | राज्यस्तरीय तांत्रिक संस्था |
| State Level Approval Committee (SLAC)<br>State Nodal Department | राज्यस्तरीय मंजुरी समिती (एॅसएॅलएसी)<br>राज्य नोडल खाते |
| State Nodal Department /Agency | राज्य नोडल खाते/एजन्सी |
| District Level Committee (DLC) | जिल्हास्तरीय समिती (डीएॅलसी) |
| State Programme Implementation Unit (SPMU) | राज्य कार्यक्रम अंमलबजावणी युनिट (एॅसपीएॅमयू) |
| Resource Persons (RP) | संसाधन व्यक्ती (आरपी) |

## 9.2 राष्ट्रीय स्तरावरील रचना

### 9.2.1 आंतर-मंत्रालयीन अधिकारिता समिती:

9.2.1.1 राष्ट्रीय स्तरावर, अन्न प्रकिया उद्योग मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक आंतर-मंत्रीय अधिकारिता समिती (आयएॅमईसी) असेल, ज्याची रचना पुढीलप्रमाणे असेल.

**तक्ता 1 : आयएॅमईसीची रचना**

| | **रचना** | **पद** |
|---|---|---|
| 1. | माननीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री | अध्यक्ष |
| 2. | माननीय अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री | उपाध्यक्ष |
| 3. | सचिव, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, भारत सरकार | सदस्य |
| 4. | सचिव, कृषी, सहकार व शेतकरी कल्याण खाते, भारत सरकार | सदस्य |
| 5. | सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय खाते, भारत | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | सरकार | |
| 6. | सचिव, कृषी संशोधन आणि शिक्षण, भारत सरकार | सदस्य |
| 7. | सचिव, मत्स्यव्यवसाय खाते, भारत सरकार | सदस्य |
| 8. | सचिव, नगर विकास व गृहनिर्माण खाते, भारत सरकार | सदस्य |
| 9. | सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार | सदस्य |
| 10. | सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय | सदस्य |
| 11. | सचिव, ऍमऍसऍमई मंत्रालय, भारत सरकार | सदस्य |
| 12. | अध्यक्ष, ऍफऍसऍसएआय | सदस्य |
| 13. | अध्यक्ष, ऍनऍसडीसी | सदस्य |
| 14. | नाबार्डचा प्रतिनिधी | सदस्य |
| 15. | एऍस ऍण्ड ऍफए, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय | सदस्य |
| 16. | निती आयोगाचा प्रतिनिधी | सदस्य |
| 17. | मिशन संचालक, (अवर/सह सचिव या श्रेणीचा किंवा त्यावरील श्रेणीचा अधिकारी), अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय | सदस्य सचिव |

9.2.1.2 ऍमओऍफपीआयतर्फे आयऍमईसी, पीईसी आणि क्षमता निर्माण व संशोधनावरील समितीवर इतर कोणताही सदस्य नामनिर्देशित केला जाऊ शकतो. आयऍमईसीची तिमाहीतून किमान एकदा बैठक होईल आणि ती योजनेला एकूण दिशा देण्यासाठी व अंमलबजावणीच्या मार्गदर्शनासाठी धोरण आखणारी संस्था असेल आणि योजनेच्या प्रगतीवर व कामगिरीवर देखरेख ठेवून त्याचा आढावा घेईल.

9.2.1.3 आयएॅमईसीची कार्ये पुढीलप्रमाणे असतील:

**i) पुढील गोष्टींना मंजुरी देणे:**

a) योजनेच्या मार्गदर्शक सूचना;

b) एॅसएॅलएसीद्वारे यथोचित मंजुरी मिळाल्यानंतर राज्यांनी सादर केलेल्या पीआयपी;

c) तज्ज्ञ संस्था नामिकाप्रविष्ट करणे;

d) रू. 10 लाखांहून अधिक प्रकल्पाच्या सर्व प्रस्तावांना मंजुरी;

e) क्षमता निर्माण व संशोधनासाठी पीआयपी;

**ii) पुढील गोष्टींचा आढावा घेणे:**

a) पीआयपीची अंमलबजावणी;

b) विविध अभ्यास;

c) एॅमओएॅफपीआय आणि राज्य एजन्सीजचे क्षमता निर्माण उपक्रम;

d) एॅण्टरप्राईजेस व समूहांना कौशल्ये व ईडीपीवर प्रशिक्षण देणे – प्रशिक्षण समितीच्या अभिप्रायानुसार समयोचित प्रशिक्षणांचा व्यापक आढावा घेणे;

e) राज्य संस्था मजबूत करण्यायाठी हाती घेण्यात आलेले उपक्रम;

f) सूक्ष्म एॅण्टरप्राईजेस व समूहांना नोडल बँकांसहित समयोचित अनुदान वितरित करणे;

iii) उपरोक्त मंजुरीच्या व आढाव्यांच्या उपक्रमांव्यतिरिक्त, आयएॅमईसीतर्फे

पुढील कार्येही हाती घेण्यात येतील:

a) तिमाही ध्येये ठरविणे व त्यांचा आढावा घेणे;

b) आंतर-मंत्रीय सहकार व अभिसरणाची देखरेख करणे;

c) एकूण योजनेच्या प्रगतीचे पर्यवेक्षण करणे;

d) राज्यांच्या कामगिरीचे पर्यवेक्षण करणे;

e) योजनेच्या अंमलबजावणीशी संबंधीत इतर कोणतीही बाब.

## 9.2.2 प्रकल्प कार्यकारी समिती:

9.2.2.1 योजनेच्या नियमित देखरेखीसाठी आणि अंमलबजावणीसाठी, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयात कार्य स्तरावर एक प्रकल्प कार्यकारी समिती गठित केली जाईल, ज्याची रचना खालीलप्रमाणे असेल:

**तक्ता 2: पीईसीची रचना**

| | | |
|---|---|---|
| (i) | अवर सचिव, एॅमओएॅफपीआय | अध्यक्ष |
| (ii) | अवर/सह सचिव – वाणिज्य, कृषी, ग्रामीण विकास, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवयास, एॅमएॅसएॅमई, एॅमएॅसडीई, नगरविकास व गृहनिर्माण आणि निती आयोग मंत्रालय/खाते | सदस्य |
| (iii) | एएॅस एॅण्ड एॅफए, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय | सदस्य |
| (iv) | एपीईडीए, एॅमपीईडीए, एॅनआयएॅफटीईएॅम, आयआयएॅफपीटी, सीएॅफटीआरआय, राष्ट्रीय फलोत्पादन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | मंडळ (ऍनऍचबी), ऍफऍसऍसएआय, नाबार्ड यांचे प्रतिनिधी | |
| (v) | अन्न प्रक्रिया, बँकिंग/वित्त आणि विपणन यामधील तज्ज्ञ | सदस्य |
| (vi) | टीआरआयऍफईडी, ऍनसीडीसी, ऍनऍससीऍफडीसी आणि ऍसऍफएसी या भागीदार संस्थांचे नामनिर्देशित व्यक्ती | सदस्य |

9.2.2.2 कार्यकारी समितीची महिन्यातून एकदा बैठक होईल आणि त्याची कार्ये खालीलप्रमाणे असतील:

**i) खालील गोष्टींची मंजुरी:**

a) राज्यांची, राष्ट्रीय संस्थांची, राज्यस्तरीय तांत्रिक संस्थांची पीआयपीसहित आयऍमईसीला मंजुरीसाठी सादर केलेल्या सर्व प्रस्तावांची आणि राज्यांनी रू. 10 लाखांपेक्षा अधिकच्या प्रस्तावित केलेल्या मंजुरीसाठीच्या प्रकल्पांची तपासणी;

b) ऍनपीऍमयू गठित करणे;

c) भारत सरकारतर्फे खर्च करण्यात येणाऱ्या वस्तूंच्या योजनेंतर्गतचे प्रकल्प आणि रू. 10 लाखापर्यंत मर्यादा असलेले 100% केंद्रीय वाटा असलेले प्रकल्प मंजुर करणे.

d) स्वतंत्र लाभार्थींना भारत सरकारचा वाटा म्हणून अनुरूप अनुदानाचा 60% वितरित करणे

e) आयईसी प्रस्ताव

f) ऍमआयऍस संबंधी निर्णय;

**ii) खालील गोष्टींचा आढावा:**

a) नोडल बँकांसह सूक्ष्म ऍण्टरप्राईजेसना व गटांना वेळेवर अनुदान वितरित करणे आणि गरज भासल्यास आयऍमईसीमध्ये वाढ करणे.

iii) उपरोक्त मंजुरी व आढावा उपक्रमांव्यतिरिक्त, पीईसी खालील उपक्रमही हाती घेईल:

a) आयऍमईसीद्वारे ठरविण्यात आलेल्या वार्षिक ध्येयांच्या अनुरूप, योजनेसाठी मासिक ध्येय निश्चित करणे;

b) पोर्टलद्वारे व प्रभावी डॅशबोर्ड देखरेखीद्वारे योजनेच्या प्रगतीवर देखरेख ठेवणे;

c)आंतर मंत्रालयांचे सहकार्य.

**9.2.3 क्षमता निर्माण व संशोधनावरील समिती:**

9.2.3.1 प्रशिक्षण व संशोधनाच्या पैलूंचे पर्यवेक्षण करण्यासाठी, राष्ट्रीय स्तरावर क्षमता विकास व संशोधनावरील समिती असेल. प्रख्यात उद्योग तज्ज्ञ या समितीचे अध्यक्ष असतील. समितीचे सदस्य खालीलप्रमाणे असतील:-

**तक्ता 3 – ऍमओऍफपीआयमधील प्रशिक्षण समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| (i) | उद्योग तज्ज्ञ | अध्यक्ष |
| (ii) | कुलगुरू, ऍनआयऍफटीईऍम / संचालक, आयआयऍफपीटी | सदस्य |
| (iii) | कौशल्य विकास हाताळणारे जेऍस, ऍमओऍफपीआय | सदस्य |
| (iv) | जेऍस, ऍमऍसडीई | सदस्य |
| (v) | अन्न क्षेत्र कौशल्य मंडळाचा प्रतिनिधी | सदस्य |
| (vi) | सीऍफटीआरआय/डीऍफआरऍल/संबंधित आयसीएआर संस्थांचे प्रतिनिधी | सदस्य |
| (vii) | ग्रामीण विकास मंत्रालयाचा प्रतिनिधी | सदस्य |
| (viii) | कार्यक्रम संचालक, ऍमओऍफपीआय यांनी नामनिर्देशित केलेले बँकिंग/ वित्त आणि विपणन/ब्रँडिंग मधील तज्ज्ञ | सदस्य |

9.2.3.2 क्षमता विकास व संशोधनावरील समितीची कार्ये खालीलप्रमाणे असतील:

**1. खालील गोष्टींची मंजुरी:**

i) योजनेंतर्गत होणाऱ्या क्षमता विकास व संशोधन उपक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शन;

ii) पीईसी/आयऍमईसी कडून पुढील वित्त मंजुरीसाठीचे ऍमओऍफपीआयचे, राज्यांचे आणि जिल्हा एजन्सीजचे क्षमता विकास उपक्रमाचे प्रस्ताव;

iii) ऍण्टरप्राईजेसना व गटांना राष्ट्रीय व राज्य एजन्सीजतर्फे दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचे कॅलेंडर व अभ्यासक्रम;

iv) ऍण्टरप्राईजेससाठीच्या ऍफयूपीज व डीआरपीजसाठी आधारभूत साहाय्य मॉड्युल्सचा अभ्यासक्रम;

**2. खालील गोष्टींचा आढावा:**

i) राष्ट्रीय, राज्य एजन्सीज व जिल्हा संसाधन व्यक्तींनी मंजुर केलेल्या प्रशिक्षण कॅलेंडरनुसार दिले जाणारे प्रशिक्षण.

**9.2.4 राष्ट्रीय कार्यक्रम व्यवस्थापन युनिट (ऍनपीऍमयू):** कंत्राटी तत्त्वावर सामावून घेतलेल्या व्यावसायिकांचा समावेश असलेले एक पीऍमयू राष्ट्रीय स्तरावर असेल. हे पीऍमयू, ऍमओऍफपीआयच्या कार्यक्रम विभागाला, वर सूचीबद्ध केलेली सर्व कार्ये करण्यास पूर्ण आधार प्रदान करेल. ऍनपीऍमयूच्या विशिष्ट कार्यांमध्ये खालील गोष्टींचा समावेश असेल:

i) आवश्यक नमुने तयार करणे, अभ्यासांची व पीआयपीची वेळेत पूर्तता होण्यासाठी राज्य पीऍमयू व ऍसऍनए सोबत जवळून समन्वय साधणे, मार्गदर्शन करणे व देखरेख ठेवणे;

ii) ऍमओऍफपीआय, राज्य व जिल्हा एजन्सीजचे क्षमता निर्माण उपक्रम आणि प्रशिक्षण समिती व पीईसी यांच्या यथोचित मंजुरीसाठी प्रस्ताव ठेवणे;

iii) राष्ट्रीय पोर्टल व ऍमआयऍसचा विकास आणि पोर्टलवर वेळेवर माहिती उपलब्ध करण्याची सुनिश्चितता करणे;

iv) प्रशिक्षण समितीद्वारे पुढील आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय, राज्य संस्था व जिल्हा संसाधन व्यक्तींनी मंजूर केलेल्या प्रशिक्षण कॅलेंडरनुसार प्रशिक्षण देणे;

v) राष्ट्रीय व राज्यस्तरीय तांत्रिक संस्था मजबूत करणे;

vi) राष्ट्रीय पोर्टलमार्फत ऍण्टरप्राईजेसना वेळोवेळी अनुदानाचे वितरण करणे;

vii) राज्ये आणि इतर एजन्सींद्वारे, ऍमओऍफपीआयकडे मंजुरीसाठी सादर केलेल्या डीपीआरचे मूल्यांकन करणे;

viii) गटांना समयोचित बीज भांडवल साहाय्याची तरतूद करणे;

ix) ऍसऍनएकडून ब्रँडिंग आणि विपणन योजनांचे, वेळोवेळी सादरीकरण करणे;

x) ऍसपीऍमयू आणि जिल्हा संसाधन व्यक्तींचे वेळेवर गठन करणे.

9.2.5 **नोडल बँक**: ऍमओऍफपीआयतर्फे, बँकांकडून सूक्ष्म ऍण्टरप्राईजेसना अनुदान देणे सुलभ व्हावे हे निश्चित करण्यासाठी, नोडल बँकेची निवड करण्यात येईल. नोडल बँकेच्या कार्यात पुढील गोष्टींचा समावेश असेल:

i) अर्जांच्या लक्ष्यित मंजुरीसाठी देखरेख ठेवणे व बँकांकडे संपर्क स्थापित करणे आणि स्वतंत्र सूक्ष्म उद्योगांना व गटांना वेळेवर अनुदान वितरित करणे;

ii) केंद्र व राज्य सरकारची अनुदानाची रक्कम, कर्ज देणाऱ्या बँकेच्या शाखेत लाभार्थींच्या बँक खात्यात, जमा करणे.

## 9.3. राज्य स्तरीय रचना

9.3. 1 राज्य स्तरावर, राज्यस्तरीय मंजुरी समितीतर्फे, या योजनेच्या अंमलबजावणीचे पर्यवेक्षण केले जाईल आणि या योजनेची व्यवस्था नामनिर्देशित राज्य नोडल एजन्सीद्वारे पाहिली जाईल, जी पीऍमयूद्वारे समर्थित केलेली असेल. तपशील खाली दिलेले आहेत.

9.3.2 **राज्य स्तरीय मंजुरी समितीः**

9.3.2 .1 राज्यस्तरीय मंजुरी समितीचे अध्यक्ष मुख्य सचिव किंवा त्यांचे नामनिर्देशक असतील व त्याची रचना पुढीलप्रमाणे असेल:

**तक्ता 4: ऍसऍलएसीची रचना**

| | | |
|---|---|---|
| (i) | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| (ii) | वित्त सचिव | सदस्य |
| (ii) | एसीऍस/स्वीय सचिव/अन्न प्रक्रिया, कृषी, उद्योग, ऍमऍसऍमई, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, कौशल्य विकास यांचे सचिव | सदस्य |
| (iii) | मिशन संचालक, ऍसआरऍलऍम | सदस्य |
| (ii) | राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| (iv) | संस्था -प्रमुख राज्य तांत्रिक संस्थांचे प्रतिनिधी | सदस्य |
| (v) | नाबार्ड, ऍनऍसडीसी, ऍसऍलबीसी, ऍनसीडीसीचे प्रतिनिधी | सदस्य |
| (vi) | राज्य सरकारतर्फे नामनिर्देशित बँकिंग/वित्त व विपणन/ब्रँडिंगमधील तज्ज्ञ | सदस्य |
| (vii) | राज्य नोडल अधिकारी | सदस्य सचिव |

9.3.2.2 राज्य सरकार, ऍसऍलएसी किंवा डीऍलसीमध्ये कोणत्याही अन्य सदस्यास नामनिर्देशित करु शकते.

9.3.2.3 राज्यस्तरीय मंजुरी समिती, पुढील मंजुरीसाठी जबाबदार असेल:

i) सर्वेक्षण/ अध्ययन;

ii) ऍसऍनएद्वारे सादर केलेला पीआयपी;

iii) राज्य आणि जिल्हा अधिकाऱ्यांचे क्षमता निर्माण उपक्रम;

iv) राज्य स्तरीय संस्था, ऍण्टरप्राईजेससाठी प्रशिक्षण आणि कौशल्य विकास कॅलेंडर;

v) राज्य संस्था मजबूत करणे;

vi) ऍमओऍफपीआयकडे शिफारस करण्यासाठी गटांना अनुदान प्रस्ताव;

vii) सामान्य सुविधा, गट आणि विपणन व ब्रँडिंगच्या तरतुदींसाठी प्रस्ताव;

viii) गटांना बीज भांडवल;

ix) ऍसऍलएसीला, पीआयपीमध्ये समाविष्ट असलेल्या विविध उपक्रमांवर, रु. 10 लाख पर्यंत प्रकल्प खर्च मंजूर करण्याचा अधिकार असेल;

9.3.2.3 वरील मंजुरींव्यतिरिक्त, ऍसऍलएसीतर्फे खालील उपक्रमसुद्धा हाती घेतले जातील:

i) योजनेच्या एकूण लक्ष्यांच्या अनुरूप, योजनेसाठी मासिक लक्ष्य निश्चित करणे.

ii) पोर्टलद्वारे योजनेच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे.

iii) इतर संबंधित संस्थांकडे तालमेल सुनिश्चित करणे.

iv) योजनेंतर्गत अनुदानित युनिट्स/सीऍफसीची तपासणी सुनिश्चित करणे.

9.3.3 **राज्य नोडल खाते:** या योजनेच्या अंमलबजावणीचे पर्यवेक्षण करण्यासाठी, प्रत्येक राज्य सरकारने, सरकारी पातळीवर नोडल खाते व राज्य नोडल अधिकारी यांची नेमणूक केली पाहिजे. सूक्ष्म व समूह पातळींवर, अन्न प्रक्रिया क्षेत्रात सहभागी, राज्यातील विविध विभागांचे सापेक्ष सामर्थ्य व अनुभवाचा विचार करून नोडल विभागाची निवड केली पाहिजे. राज्य नोडल अधिकारी, सचिव किंवा संचालक/ऍचओडी या श्रेणीचे असले पाहिजेत. संभाव्य नोडल खाती, कृषी किंवा फलोत्पादन खाते, अन्न प्रक्रिया खाते, उद्योग खाते, ऍमऍसऍमई खाते किंवा ग्रामीण विकास खाते, असू शकतात.

9.3.4 **राज्य नोडल एजन्सी:** प्रत्येक राज्याने एक राज्य नोडल एजन्सीची नेमणूक केली

पाहिजे. राज्य नोडल एजन्सी (ऍसऍनए) ही, एक संचालनालय किंवा मिशन किंवा राज्य सरकारची संस्था असू शकते. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी, ऍसऍनए राज्य स्तरावर कार्यरत एजन्सी असेल. ऍसऍनएच्या भूमिका व जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे असतील.

i) विविध अध्ययन करणे;

ii) पीआयपी तयार करून घेणे;

iii) राज्यस्तरीय तांत्रिक संस्था व जिल्हा संसाधन व्यक्ती यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण आणि क्षमता निर्माण उपक्रमांवर देखरेख ठेवणे;

iv) राज्यस्तरीय तांत्रिक संस्था मजबूत करणे;

v) जिल्हा समित्यांद्वारे अनुदानाचे प्रस्ताव वेळेवर सादर केल्याचे सुनिश्चित करणे;

vi) सामान्य सुविधांच्या तरतुदीसाठीच्या योजना वेळेवर सादर केल्याचे सुनिश्चित करणे;

vii) गटांचे प्रारंभिक भांडवल प्रस्ताव वेळेवर सादर केल्याचे सुनिश्चित करणे;

viii) ब्रँडिंग व विपणन प्रस्ताव विकसित करणे;

ix) डीपीआरसाठी, जिल्हा संसाधन व्यक्तींकडून ऍण्टरप्रायझेसना दिल्या जाणाऱ्या प्रारंभिक साहाय्याची देखरेख करणे;

x) ऍसपीऍमयूची स्थापना करणे;

xi) जिल्हा संसाधन व्यक्तींच्या नियुक्तींवर देखरेख ठेवणे व मंजुरी देणे;

xii) ऍमओऍफपीआयला, उपयोगिता प्रमाणपत्रे (यूसी) आणि नियमित प्रगती अहवाल विहित नमुन्यांमध्ये देणे;

xiii) आयईसी;

xiv) सर्वोत्तम पद्धतींची माहिती करून देणे.

9.3.5 **राज्य प्रकल्प व्यवस्थापन यूनिट (ऍसपीऍमयू):** राज्य नोडल एजन्सीने (ऍसऍनए)

राज्यप्रकल्प व्यवस्थापन यूनिटची (ऍसपीऍमयू) नेमणूक केली पाहिजे. ऍसपीऍमयूची नेमणूक कंत्राटी पद्धतीवर किंवा प्रतिनियुक्तीवर किंवा ऍसऍनएच्या स्वत:च्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन केली जाऊ शकते. योजनेच्या कामासाठी ऍसपीऍमयूच्या कर्मचाऱ्यांची पूर्णकालीक तत्त्वावर नेमणूक करण्यात यावी. ऍसऍनए स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे, ऍसपीऍमयू म्हणून खासगी एजन्सी नेमण्याचा निर्णयही घेऊ शकते.

9.3.6 ऍसऍनएला प्रशासकीय खर्च म्हणून, योजना खर्चाचे 2% दिले जाईल. योजने अंतर्गत परवानगी दिलेल्या 2% प्रशासकीय खर्चातून, ऍसऍनएद्वारे, ऍसपीऍमयूचा खर्च वहन केला जाईल. ऍसपीऍमयूच्या कर्मचाऱ्यांचा तपशील व अर्हता विहित केल्याप्रमाणे असेल.

9.3.6.1 परिच्छेद 3.3.6 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे, सर्व कार्यात ऍसऍनएला पाठिंबा देण्याची ऍसपीऍमयूची मुख्य जबाबदारी असेल.

### 9.3.7 जिल्हास्तरीय संरचना

9.3.7.1 **जिल्हास्तरीय समितीः** जिल्हा पातळीवर, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती (डीऍलसी)ची स्थापना केली जाईल. या समितीमध्ये पंचायती, बँका, विषय तज्ज्ञ, शैक्षणिक संस्था, सामुदायिक संस्था, ऍफपीओ/ऍसऍचजी इत्यादींचा समावेश असेल. डीऍलसीचा सदस्य म्हणून जिल्हाधिकारी इतर कोणत्याही व्यक्तीची सह निवड करू शकतात. जिल्हास्तरीय समितीची रचना पुढीलप्रमाणे असेलः

**तक्ता 5: डीऍलसीची रचना**

| | | |
|---|---|---|
| (i) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| (ii) | जीऍम, डीआयसी, जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा फलोत्पादन अधिकारी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| (iii) | एका ग्रामपंचायतीचे सरपंच | सदस्य |
| (iv) | एक गट विकास अधिकारी | सदस्य |
| (v) | जिल्ह्यातील अग्रणी बँकेचे व्यवस्थापक | सदस्य |
| (vi) | ऍसऍचजीचे/ऍफपीओचे प्रतिनिधी | सदस्य |
| (vii) | नाबार्डचे प्रतिनिधी | सदस्य |
| (viii) | ऍसआरऍलऍमचे जिल्हा प्रतिनिधी | सदस्य |
| (viii) | जिल्हाधिकाऱ्यांनी नामनिर्देशित केलेली कोणतीही इतर व्यक्ती | सदस्य |

9.3.7.2 खालील गोष्टींसाठी डीऍलसी जबाबदार असेल:

i) स्वतंत्र सूक्ष्म ऍण्टरप्रायईजेससाठी, कर्जाचे व अनुदानाचे अर्ज मंजूर करणे;

ii) ऍसऍनएकडे, सामान्य पायाभूत सुविधा व गटांसाठी अर्जांची शिफारस करणे;

iii) जिल्हा संसाधन व्यक्तींकडून, सूक्ष्म ऍण्टरप्रायईजेसना देण्यात येणाऱ्या साहाय्यावर देखरेख ठेवणे;

iv) पोर्टलद्वारे व प्रभावी डॅशबोर्ड देखरेखीद्वारे योजनेच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे;

v) सर्व संबंधित संस्थांकडे तालमेल सुनिश्चित करणे.

### 9.3.8 जिल्हा संसाधन व्यक्ती

9.3.8.1 जिल्हा/प्रादेशिक स्तरावर, लाभार्थींना हॅण्डहोल्डींग सपोर्ट सपोर्ट देण्यासाठी ऍसऍनएने संसाधन व्यक्तींची नियुक्ती करावी.

9.3.8.2 संसाधन व्यक्तींमध्ये पुढीलप्रमाणे अर्हता असावी:

i) प्रतिष्ठित राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय विद्यापीठाकडून/संस्थेकडून, अन्न तंत्रज्ञान/अन्न अभियांत्रिकीमधील पदविका/पदवी.

ii) अन्न प्रक्रिया उद्योगांना, तंत्रज्ञान श्रेणीसुधारणा, नवीन उत्पादन विकास, गुणवत्ता हमी, अन्न सुरक्षा व्यवस्थापनासाठी सल्लागार सेवा देण्याचा 3-5

वर्षांचा अनुभव;

iii) अन्न तंत्रज्ञानामध्ये पात्र व्यक्ती उपलब्ध नसल्यास, अन्न प्रक्रिया उद्योग, बँकिंग, डीपीआर तयार करणे आणि प्रशिक्षण यांमधील अनुभव असलेल्या व्यक्तींना सामवून घेतले जाऊ शकते.

9.3.8.3 संसाधन व्यक्तींनी स्वतंत्र युनिट्स आणि गटांना डीपीआर तयार करण्यासाठी, बँकेतून कर्ज घेण्यासाठी, एॅफएॅसएॅसएआयची खाद्य मानके, उद्योग आधार, जीएॅसटी इत्यादींसह आवश्यक नोंदणी व परवाने मिळविण्यासाठी हॅण्डहोल्डींग सपोर्ट दिला पाहिजे.

9.3.8.4 प्रत्येक लाभार्थीला उपलब्ध केलेल्या मदतीच्या आधारे, बँकेकडून लाभार्थींना कर्ज मंजूर झाल्यानंतर, संसाधन व्यक्तींना मानधन दिले जाईल. मंजूर झालेल्या प्रत्येक बँक कर्जासाठी, प्रत्येक संसाधन व्यक्तीला रु.20,000/- या दराने मानधन देण्यात येईल. बँक कर्ज मंजूर झाल्यानंतर 50% मानधन दिले जाईल व उर्वरित 50% मानधन युनिट्सने जीएॅसटी व उद्योग आधार नोंदणी केल्यानंतर, एॅफएॅसएॅसएआयच्या मानकाचे पालन केल्यानंतर, प्रकल्पाची अंमलबजावणी केल्यानंतर व प्रशिक्षण दिल्यानंतर दिले जाईल.

9.3.9 या योजने अंतर्गत, राज्य नोडल खात्याने अर्ज येणे व मंजुरी प्रक्रिया व साहाय्य यावर निर्णय घेतला पाहिजे. त्यांनी पुढील गोष्टींसाठी, डीएॅलसी, एॅसएॅनए आणि राज्यस्तरीय तांत्रिक संस्था यांच्या संबंधित भूमिकेबाबत निर्णय घेतला पाहिजे: -

(i) स्वतंत्र अर्ज निवडण्यासाठी मंजुरीचा स्तर;

(ii) राज्य पातळीवरील गटांचे अर्ज व सामान्य पायाभूत सुविधा;

(iii) प्रशिक्षण व क्षमता वाढविण्याचे उपक्रम आणि डीएॅलसी, एॅसएॅनए व राज्यस्तरीय तांत्रिक संस्था यांच्यातील निर्णय घेणे;

(iv) राज्यात अर्ज येणे व साहाय्य प्रक्रिया यासंबंधीचा निर्णय, मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या एजन्सींच्या भूमिका लक्षात न घेता लागू होईल.

### 9.3.10 अभिसरणासाठी भागीदार संस्था

9.3.10.1 या योजनेत, अनुसूचित जाती/जमाती, महिला आणि इच्छुक जिल्हे व ऍफपीओ, ऍसऍचजी आणि उत्पादक सहकारी, यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. या क्षेत्रात खालील संस्था कार्यरत आहेत:

a) टीआरआयऍफईडी;

b) राष्ट्रीय अनुसूचित जाती विकास वित्त महामंडळ;

c) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ;

d) लघु शेतकरी कृषी-व्यवसाय संघ;

e) ग्रामीण विकास मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मिशन

9.3.10.2 वरील संस्था, अनुक्रमे ऍसटी, ऍससी, सहकारी, ऍफपीओ व ऍसऍचजीच्या युनिट/समूहाची ओळख सुलभ करुन, आपल्या उपक्रमाचे कार्य बदलू शकतात. त्यांनी या योजने अंतर्गत, अशा संस्थांच्या निधीसाठी व विकासासाठी डीपीआर व प्रस्ताव तयार करण्यासाठी हॅण्डहोल्डींग सपोर्ट दिले पाहिजे व अशा प्रकारचे प्रस्ताव राज्याच्या पीआयपींना पुरविले पाहिजेत. त्यांनी अशा समर्थित युनिट्सना आधारही दिला पाहिजे व या प्रयासासाठी राज्यांबरोबर काम केले पाहिजे. प्रत्येक भागीदार संस्था पीईसीची सदस्य असेल.

## 10.0 अभ्यास व अहवाल

**10.1 राज्यस्तरीय उन्नयन योजना (ऍसऍलयूपी)**: ऍसऍनएने राज्यस्तरीय उन्नयन योजना (ऍसऍलयूपी) तयार करावी, ज्यामध्ये पुढील दोन घटकांचा समावेश असेल:

10.1.1 **बेस-लाईन आकलन**: बेसलाईन अध्ययनाने ओडीओपी निवडणे यावर भर दिला पाहिजे. प्रत्येक राज्यात, हे अध्ययन 31 जुलै 2020 पर्यंत पूर्ण झाले पाहिजे. या अध्ययनासाठी राज्यांना रु. 2.5 -10.0 लाख दिले जातील.

10.1.2 **राज्यस्तरीय उन्नयन योजना:** एकदा ओडीओपीवर निर्णय घेतल्यानंतर, जिल्ह्यात त्या उत्पादनाची प्रक्रिया सुरू असलेल्या युनिटची संख्या, शेतीच्या पातळीवर होणारी कार्ये, उत्पादनांचे एकूण प्रमाण व उत्पादाचे मूल्य, तंत्रज्ञान, शेताच्या पातळीवर होणारी प्रक्रिया, साठा, वखार, प्रक्रिया युनिट्सची संख्या, त्यांचे तपशील इ. यांचे सविस्तर अध्ययन राज्यांमध्ये केले गेले पाहिजे. हे अध्ययन 31 डिसेंबर 2020 पर्यंत करण्यात यावे. वरील अभ्यासासाठी राज्यांना दिली जाणारी रक्कम रु. 10.0 - 75.0 लाख असेल. वरील अध्ययनासाठी विचारार्थ विषय (टीओआर) विहित केल्याप्रमाणे असतील.

**10.2 ऍफपीओ/उत्पादक सहकारी/ऍसऍचजींचे अभ्यास**: वरील अध्ययनाच्या बरोबरीने ऍसऍनएने, ऍनसीडीसी, ऍसऍफएसी, टीआरआयऍफईडी, ऍनऍससीऍफडीसी व ऍसआरऍलऍम यांच्याशी समन्वय साधून, राज्यातील ऍसऍचजी, उत्पादक सहकारी, ऍफपीओ, यांच्या कामाची माहिती गोळा केली पाहिजे.

10.3 राज्यस्तरीय श्रेणीसुधारणा योजनेत विचार केल्याप्रमाणे पायाभूत सुविधा व इतर सुविधा कार्यान्वित झाल्यावर, ओडीओपीसाठी अशा जिल्ह्यांमध्ये पुढील कार्यवाहीसाठी आणखी एक अध्ययन केले पाहिजे. ऍसऍनएद्वारे करावयाच्या इतर कोणत्याही अध्ययनासाठी, त्यांनी प्रकल्प अंमलबजावणी योजनेतील अध्ययनाच्या प्रस्तावाचा समावेश केला पाहिजे व अंदाज खर्चासह मंजुरीसाठी तो ऍमओऍफपीआयकडे पाठविला पाहिजे.

11.0 **प्रकल्प अंमलबजावणी योजना (पीआयपी)**

11.1 प्रत्येक राज्याने त्या वर्षासाठीची पीआयपी, मागील वर्षाच्या जानेवारी महिन्यात तयार केली पाहिजे व त्याच वर्षाच्या 31 जानेवारीपर्यंत मंजुरीसाठी ऍमओऍफपीआयकडे पाठविली पाहिजे. पीआयपी मंजुरीसाठी आंतरमंत्रीय अधिकारिता समितीसमोर ठेवली पाहिजे. राज्यस्तरीय मंजुरी समितीने, ऍमओऍफपीआयकडे पीआयपीची शिफारस केली पाहिजे. ऍमओऍफपीआयने मागील आर्थिक वर्षाच्या 31 मार्चपर्यंत पीआयपीला मंजुरी दिली

पाहिजे. वर्ष 2020-21 मध्ये राज्यांनी पीआयपी 30 सप्टेंबर 2020 पर्यंत ऍमओऍफपीआयकडे मंजुरीसाठी पाठविल्या पाहिजेत.

11.2 पीआयपीमध्ये पुढील तपशील असले पाहिजेत: -

i) नियुक्त एजन्सी, निवडलेल्या संस्था यांच्यासह राज्यातील कार्यक्रमाची अंमलबजावणी व्यवस्था;

ii) नियुक्त अधिकाऱ्यांसह राज्य नोडल एजन्सीचा तपशील;

iii) ऍसऍलएसी/डीऍलसीची रचना;

iv) ऍसपीऍमयू व मनुष्यबळ स्थापनेचे तपशील व योजना;

v) जिल्हा संसाधन व्यक्तींच्या सेवा घेण्यासाठीचे तपशील व योजना;

vi) राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेचा तपशील;

vii) योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वर्षांसाठीचे नियोजित उपक्रम;

a) नियोजित अभ्यासाचा तपशील व पूर्ण करण्यासाठी दिलेली मुदत;

b) वेगवेगळया संस्थांसाठी, स्पष्ट भूमिका सारणीसह वर्षासाठी नियोजित प्रशिक्षणाचा तपशील;

c) अनुदान वितरणासाठी व्यापक लक्ष्य आणि ऍण्टरप्राईजेस, बूथ गट व व्यक्तींची संख्या;

d) जिल्हावार समूहांची व्यापक यादी;

e) उपक्रमामध्ये संभाव्य भागधारक म्हणून ओळखलेल्या, राज्यातील ऍसऍचजी/ऍफपीओ/सहकारी संस्थांची यादी करणे;

f) उत्पादनांसाठीचे ब्रँडिंग व विपणन योजनांचा सारांश.

viii) वर्षासाठीच्या सर्व उपक्रमांचा तपशीलवार खर्चाचा अंदाज व अंदाजपत्रक;

ix) नियोजित उपक्रमांच्या अंमलबजावणीचा तपशीलवार फ्लो चार्ट;

x) प्रत्येक व्यक्तीसाठी निश्चित केलेल्या स्पष्ट भूमिका व जबाबदाऱ्यांसह भागधारकांची सारणी.

11.3 पीआयपी हा नियोजन व अंदाजपत्रकाचा एक उपक्रम आहे. पीआयपीच्या मंजुरीनंतर, राज्यांना दिलेल्या अधिकारांच्या अधीन असलेल्या बाबींसाठी राज्यांनी खर्च करावा.

11.4 राज्यस्तरीय मंजुरी समितीला स्वतंत्र बाबींसाठी रु.10 लाख पर्यंत खर्चाला मान्यता देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत आणि रु.10 लाखांपेक्षा जास्त खर्चाच्या कोणत्याही प्रस्तावांना मंजुरीसाठी ऍमओऍफपीआयकडे पाठविले पाहिजे. त्यामध्ये रु.10 लाखांपेक्षा अधिक अनुदान असलेल्या प्रकल्पांसाठीचे डीपीआर्स, राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेवरील खर्च जो रु.10 लाखांपेक्षा अधिक असेल, इत्यादींचा समावेश असेल.

11.5 ऍनआयऍफटीईऍम व आयआयऍफपीटीच्या बाबतीत, त्यांच्या पीआयपीच्या मंजुरीनंतर रु.10 लाखपर्यंतच्या खर्चासाठी संघटनेच्या अधीन असलेल्या विद्यमान अधिकारांचा वापर केला पाहिजे. रु.10 लाखांहून अधिक खर्चाचा कोणताही प्रस्ताव, हा विशिष्ट प्रस्ताव म्हणून, मंजुरीसाठी ऍमओऍफपीआयकडे पाठविला पाहिजे.

## 12.0 निधीचे संवितरण

12.1 केंद्राने पुरस्कृत केलेली ही एक योजना आहे, ज्यामध्ये केंद्र व राज्यांदरम्यान संसाधनाची विभागणी पुढीलप्रमाणे असते.

i) केंद्र-राज्य हिस्सा 60:40;

ii) केंद्र व हिमालयीन व ईश्यान्येकडील राज्यांदरम्यान 90:10 अशा प्रमाणात विभागणी;

iii) विधानमंडळ असेलल्या केंद्रशासित प्रदेशांना केंद्र व राज्यांदरम्यान 60:40

याप्रमाणे विभागणी;

iv) विधीमंडळाविना केंद्रशासित प्रदेशांना केंद्र सरकारतर्फे 100% निधी पुरविला जाईल.

12.2 केंद्र सरकारतर्फे पुढील घटकांची पूर्तता 100% केली जाईल:

i) क्षमता निर्माण व प्रशिक्षण;

ii) ऍमओऍफपीआयसाठी राष्ट्रीय पीऍमयूचा प्रशासकीय खर्च;

iii) राष्ट्रीय स्तरावर दृकश्राव्य, मुद्रण साहित्याचा विकास, मॉड्युल्सचा विकास इत्यादींच्या संदर्भात प्रशिक्षण साहाय्य;

iv) ऍमआयऍस;

v) तंत्रज्ञान, उत्पादन इत्यादींचा विकास;

vi) राष्ट्रीय स्तरावरील भागीदार संस्थांना आधार;

vii) राष्ट्रीय स्तरावर प्रचारात्मक उपक्रम;

viii) भारत सरकारने थेट केलेला इतर कोणताही खर्च, 100% ऍमओऍफपीआयतर्फे उचलला जाईल.

12.3 पहिल्या वर्षात, केंद्र किंवा राज्यांनी केलेला खर्च, 100% भारत सरकारतर्फे उचलला जाईल. राज्याचा अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर ही योजना सुरू करण्यात आली होती, म्हणून असे करण्यात येत आहे. म्हणून, पूरक अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतरच राज्ये निधी पुरवू शकतील. पहिल्या वर्षात केलेल्या खर्चाचे समायोजन, 60:40 अशा प्रमाणात, पुढील चार वर्षांत, राज्यांना दिल्या जाणाऱ्या निधीतून समान पद्धतीने केले जाईल.

12.4 मंजूर केलेल्या पीआयपीच्या आधारे, पूर्वी जाहीर करण्यात आलेला निधीशिवाय,

हस्त्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र (यूसी) दिल्यानंतर, राज्यांना हा निधी वर्षाला दोन हस्त्यांमध्ये देण्यात येईल. वर्ष 2020-21 मध्ये हस्तांतरित केलेल्या निधीसाठी, यूसीची अशी कोणतीही आवश्यकता नाही.

12.5 पीएॅमयू, अध्ययन व प्रशिक्षण यासाठीच्या प्रशासकीय खर्चासाठी राज्यांना, 2020-21 च्या दुसऱ्या/तिसऱ्या तिमाहीत अनुदान दिले जाईल. त्यानंतर, पीआयपीच्या मंजुरीनंतर राज्यांना 2020-21 या संपूर्ण वर्षासाठी, एकाच हस्त्यामध्ये निधी देण्यात येईल.

12.7 **अनुसूचित जाती (ऍससी)/अनुसूचित जमाती (ऍसटी)/ उत्तर पूर्व प्रदेश (एनईआर) यांच्यासाठी वाटप**.

12.7.1 या योजने अंतर्गत अनुसूचित जाती/जमाती व ऍनईआरसाठी विशिष्ट तरतूद केली जाईल. हा निधी, राज्यातील अनुसूचित जाती/जमातीच्या लोकसंख्येच्या आधारे, राज्यांना देण्यात येईल. या योजने अंतर्गत, अशा प्रकारच्या अनुसूचित जाती/जमाती वाटपाचा उपयोग फक्त, अनुक्रमे अनुसूचित जाती/जमातीच्या मालकी यूनिट्सच्या हितासाठी केला जाऊ शकतो. गटांच्या बाबतीत, अशा गटांमधील 50% पेक्षा जास्त सदस्य अनुसूचित जाती/जमाती समुदायाचे असल्यासच या निधीचा उपयोग केला जाऊ शकतो. ईशान्येकडील राज्यांच्या बाबतीत, या योजनेंतर्गत, अशा राज्यांमध्ये हा निधी वापरण्याच्या निकषांचे पालन करून वाटप केले जाईल.

13.0 **क्रेडिट लिंकेज**

13.1 या योजने अंतर्गत मुख्य खर्च हा, सूक्ष्म अन्न प्रक्रिया ऍण्टरप्राईजेससाठी 35% दराने पत अनुबंधित अनुदान आहे, जे कमाल रु.10 लाख असेल. याव्यतिरिक्त, गटांना भांडवली गुंतवणुकीसाठी, 35% पत अनुबंधित अनुदान दिले जात आहे, सामान्य पायाभूत

सुविधांकरिता 35% पत अनुबंधित अनुदान दिले जाते आहे. हे अनुदान, बँकेने कर्ज मान्य केल्यानंतर, कर्ज देणाऱ्या बँकेत जमा केले जाईल.

13.2 राष्ट्रीय स्तरावर, बँकांना अनुदानाचे वितरण करण्यासाठी व बँकांशी संपर्क ठेवण्यासाठी नोडल बँक नियुक्त केली जाईल.

13.3 कर्ज मंजूर करणारी बँक लाभार्थीच्या नावावर मिरर खाते उघडेल. कर्ज देणारी बँक, कर्ज मंजूर करण्यासंबंधीची माहिती, राष्ट्रीय स्तरावरील नोडल बँकेला देईल. ही माहिती मिळाल्यानंतर, राज्य व केंद्र सरकारने त्यांचा अनुक्रमे 40% व 60% अनुदानाचा हिस्सा नोडल बँकेकडे जमा केला पाहिजे. नोडल बँक, केंद्राच्या अनुदानाचा 60% हिस्सा व राज्याच्या अनुदानाचा 40% हिस्सा, एकत्रितपणे कर्ज देणाऱ्या बँकेच्या शाखेत जमा करेल. त्या बँकेच्या शाखेने, ही रक्कम लाभार्थीच्या मिरर-बँक खात्यात ठेवली पाहिजे. कर्ज देणाऱ्या बँकेने लाभार्थी/पुरवठादारास सामान्य बँकिंग पद्धतीनुसार मंजूर कर्जाची रक्कम दिली पाहिजे.

13.4 कर्जाच्या अंतिम हिश्श्याच्या वितरणापासून तीन वर्षांच्या कालावधीनंतर, लाभार्थीचे खाते अद्याप प्रमाणित असल्यास व युनिट कार्यरत असल्यास, अनुदानाची ही रक्कम लाभार्थीच्या बँक खात्यात समायोजित केली जाईल. कर्ज वितरणाच्या तारखेपासून तीन वर्षापूर्वीचे खाते एँनपीए झाल्यास, अनुदानाची रक्कम बँकेद्वारे, लाभार्थीने केलेल्या परतफेडीसाठी समायोजित केली जाईल. प्रमाणित खात्याच्या बाबतीत, अनुदानाची रक्कम कर्जाच्या रकमेसाठी तीन वर्षानंतर समायोजित केलेली असल्यास, कर्जदाराला, कर्ज देणाऱ्या बँकेद्वारे अनुदानाची रक्कम मिळाल्याच्या तारखेपासून, या रकमेच्या समान, बँकेद्वारे वितरित केलेल्या कर्जाच्या हिस्स्यावर व्याज द्यावे लागणार नाही.

13.5 या योजने अंतर्गत, कर्जदाराला क्रेडिट गॅरंटी कव्हरेजचा लाभ, दिलेल्या कर्जासाठी, नॅशनल क्रेडिट गॅरंटी ट्रस्टी कंपनीच्या आपल्या सामान्य अटी व शर्तींच्या माध्यमातून, सूक्ष्म व लघु एँण्टरप्राईजेस क्रेडिट गॅरंटी ट्रस्ट अंतर्गत देण्यात येईल. एँमएँसएँमई वाढीव पत व्याज अर्थसाहाय्य योजना 2018 अंतर्गत, कर्जदारांना जमा रकमेवर 2% दराने व्याज अर्थसाहाय्य उपलब्ध असेल.

13.6 एसएनएने हे सुनिश्चित केले पाहिजे की अर्ज मासिक किंवा तिमाही आधारावर एकत्रितपणे पाठविण्याऐवजी नियमितपणे बँकांना पाठविले जातील.

13.7 हे अर्ज अर्जदाराच्या मूलभूत केवायसीसह बँक शाखेत पाठवावेत. प्रक्रियेचा कालावधी कमी करण्यासाठी, अर्ज / युनिट / यंत्रसामग्री, नोंदणी आणि आवश्यक सरकारी मंजुरी इत्यादींसाठी जमिनीच्या लीज / मालकीची कागदपत्रे यासारख्या कर्जाच्या अर्जासाठी आवश्यक असणारी सर्व आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज बँकांना पाठवावेत.अर्जामध्ये प्रकल्पाचा संपूर्ण तपशील असला पाहिजे आणि डीपीआर लोकलच्या आर्थिक व्यवहार्यतेशी सुसंगत असावा. प्रकल्पाच्या आर्थिक व्यवहार्यतेच्या वाजवी आकलनावर आधारित प्रकल्प किंमत ही एक वास्तववादी आकृती असावी.

**14.0 एमआयएस**

14.1 या योजनेचे परीक्षण केले जाईल आणि आकडेवारीचा संपूर्ण प्रवाह आणि प्रस्तावांना मान्यता वगैरे ऑनलाईन प्रणालीद्वारे होईल. या उद्देशाने एमओपीपीआयमार्फत एमआयएस विकसित केला जाईल. पुढील माहिती प्रवाह / मंजूरी एमआयएसवर होईलः

i) राज्यांनी पाठविलेले पीआयपीचे प्रस्ताव आणि एमओपीपीआयने केलेल्या बदलांसह त्यांची मंजुरी;

ii)राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण संस्थांद्वारे पीआयपीला पाठवण्यात आलेले प्रस्ताव आणि कोणत्याही बदलासह त्यांच्या मंजुरीचा प्रस्ताव;

iii) वैयक्तिक सूक्ष्म खाद्य प्रक्रिया एँण्टरप्राईजद्वारे सादर केलेले कर्जासाठी अर्ज;

iv) डीपीआर अपलोड करणे आणि हँड-होल्डिंग साहाय्यतेचा तपशील प्रदान करणे;

v) वैयक्तिक युनिट्सना प्रदान केलेल्या प्रशिक्षण साहाय्यतेचा तपशील;

vi) बँकांना कर्जाचे प्रस्ताव पाठविणे;

vii) बँकांकडून कर्ज मंजूर होण्याचे तपशील अपलोड करणे;

viii) गटांसह कोणत्याही व्यक्तीला किंवा एजन्सीला दिलेली कोणतीही देय रक्कम आणि खात्यांची देखभाल;

ix) प्रशिक्षण किंवा हँड-होल्डिंगच्या बाबतीत गट आणि व्यक्तींना प्रदान केलेली कोणतीही साहाय्यता;

x) योजनेंतर्गत निवडलेल्या प्रत्येक व्यक्ती आणि गटासाठी एक खाते वही असावी. या खाते वहीत वैयक्तिक आणि गटाला दिलेल्या सर्व साहाय्यतेचा तपशील, त्यांच्या आर्थिक कार्याचा तपशील, कर्जाचे वितरण इत्यादींचा तपशील असायला हवा;

xi) योजनेंतर्गत एसएनए / एमओएफपीआयद्वारे कोणत्याही घटकाला दिलेली सर्व देयके एमआयएसमध्ये समाविष्ट असले पाहिजेत. या योजनेंतर्गत राबविलेले सर्व उपक्रम एमआयएसमध्ये समाविष्ट असले पाहिजेत;

xii) एमएफओपीआय एमआयएस विकसित करेल. त्यात विकास, देखभाल आणि देखरेखीसाठी सर्व खर्च योजनेअंतर्गत एमओपीपीआयद्वारे करण्यात येईल.

## 15.0 विशेषज्ञ संस्थांची सूची

15.1 विपणन, संशोधन, उत्पादन विकास, पॅकेजिंग, ब्रँडिंग, प्रशिक्षण, हँड-होल्डिंग साहाय्यता इत्यादी क्षेत्रातील कौशल्य असलेल्या सरकारी आणि खाजगी दोन्ही संस्था मोठ्या संख्येने अस्तित्त्वात आहेत. एमओपीपीआय या प्रत्येक कामांसाठी, राष्ट्रीय स्तरावरूल संस्थांची सूची तयार करेल त्यांच्या सेवांचा राज्यांद्वारे वापर केला जाऊ शकेल. सूची तयार करण्याचे हे कार्य क्षेत्रातील तज्ञांच्या मूल्यांकनासाठी पारदर्शक प्रक्रियेद्वारे केले जाईल. या सूचीबध्द संस्थाद्वारे करण्यात येणाऱ्या कार्यासाठी आर्थिक प्रस्तावांना आमंत्रित केल्यानंतर राज्यांद्वारे त्यांना काम सोपविण्यात आले पाहिजे.

## 16.0 अभिसरण संरचना

16.1 योजनेअंतर्गत साहाय्यता प्राप्त करणारे अन्न प्रक्रिया ऍण्टरप्रक्रिया खालील सरकारी योजनांतर्गत लाभ घेण्यास पात्र असतील:

i) राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशन – स्वयं साहाय्य गटांना प्रारंभिक भांडवल, प्रशिक्षण, हँड-होल्डिंग साहाय्यता आणि व्याज साहाय्य प्रदान करीत आहे;

ii) स्टार्ट-अप ग्रामीण उद्योजकता कार्यक्रम (एसव्हीईपी) - ही एक केंद्र पुरस्कृत योजना आहे आणि एनआरएलएमचा एक भाग आहे, यामध्ये 12% व्याज दराने वैयक्तिक उद्योजकांसाठी 1 लाखापर्यंत आणि उद्योग समूहांना 5 लाख रुपयापर्यंत कर्ज सामुदायिक एँण्टरप्राईज निधी (सीईएफ) च्या माध्यमातून ग्रामीण स्टार्ट-अप प्रशिक्षण, हँड-होल्डिंग आणि साहाय्यतेद्वारे भांडवल आणि तांत्रिक साहाय्यता प्रदान केली जाते.

iii) एमएसएमईला वाढीव पतपुरवठ्यासाठी व्याज साहाय्यता योजना 2018- - थकबाकीवरील 2% व्याज साहाय्यता;

iv) 2 कोटी रुपयांपर्यंतच्या संपार्श्विक नि: शुल्क कर्जाच्या हेतूने सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी (सीजीटीएमएसई) क्रेडिट गॅरंटि ट्रस्ट फंड;

v) 10 लाखांपर्यंतच्या कर्जासाठी प्रधानमंत्री मुद्रा योजना;

vi) नवीन उपक्रम, ग्रामीण उद्योग आणि उद्योजकता यांना प्रोत्साहन देण्यासाठी योजना (एएसपीआयआरई);

vii) ग्रामीण उद्योग पुनरूत्पादन निधी योजना (एसएफयूआरटीआय);

viii) एमएसईसाठी सार्वजनिक खरेदी धोरण;

ix) क्लस्टर्स/गटांना साहाय्यता उपलब्ध करून देण्यासाठी एमओपीपीआयच्या अनेक योजनांमध्ये उपलब्ध असलेले फायदे जसे की मागास आणि फॉरवर्ड लिंकेज, कृषी उत्पादन क्लस्टर, कोल्ड चेन इत्यादींच्या अंतर्गत उपलब्ध लाभांचा उपयोग केला जाईल.

x) जर मार्गदर्शक तत्त्वां अंतर्गत येत असतील तर बचत गटांना कौशल्य प्रशिक्षण देण्यास पीएमकेव्हीवाय आणि एनआरएलएमकडून सहकार्य घेतले जाईल. कमी कालावधीतील साइट ट्रेनिंगच्या उद्देशाने गरजेनुसार बनविण्यात आलेले एनआरएलएम व पीएम एफएमई योजनेकडून साहाय्यता प्रदान करण्यात येईल.

| ENGLISH | MARATHI |
| --- | --- |
| COLD STORAGE | शीत साठा |
| TRANSPORTATION | वाहतूक |
| COMMON FACILITIES GRADING AND SORTING | सामान्य सुविधा ग्रेडींग आणि सॉर्टिंग |
| SUPPORT TO | साहाय्यता देणे |
| FOOD PROCESSING UNITS UPGRADATION OF PROCESSING UNITS CREATION OF COMMON INFRA | अन्न प्रक्रिया युनिट्स<br>प्रक्रिया युनिट्सचे अद्ययावतीकरण<br>सामान्य साधन सुविधा निर्माण करणे |
| PRODUCTS | उत्पादने |
| PROCESSING | प्रक्रिया |
| BRANDING & MARKETING | ब्रॅडींग आणि विपणन |
| PACKAGING & LABELLING | पॅकेजिंग आणि लेबलिंग |
| CAPACITY BUILDING & RESEARCH | क्षमता निर्माण आणि संशोधन |
| SCHEME FOR FORMALIZATION OF MICRO FOOD PROCESSING ENTERPRISES(FME) | सूक्ष्म अन्न प्रक्रिया एँण्टरप्राईजचे औपचारिकरण करण्याची योजना |
| MINISTRY OF FOOD PROCESSING INDUSTRIES,,<br>GOVERNMENT OF INDIA | अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय<br>भारत सरकार |

## 12.05.2020 रोजी प्रधानमंत्र्यांनी देशाला केलेले संबोधन – आत्मनिर्भर भारत

सगळ्या नागरिकांना शुभेच्छा, मागील ४ महिन्यांपासून वैश्विक महामारी कोरोना विषाणू विरूध्द लढत आहेत.

या कालावधित जगभरातील 42 लाखापेक्षा अधिक लोक कोरोनामुळे बाधित झाले आहेत. दुर्देवाने 2.75 लाखांपेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला. भारतातसुध्दा, लोकांनी आपल्या जवळची आणि मायेची माणसे गमावली. सगळयांसाठी मी मनापासून शोक व्यक्त करतो.

मित्रांनो, या विषाणूने विश्व नष्ट केले आहे, जगभरातील करोडो लोक ह्या संकटाला सामोरे जात आहेत. अनमोल प्राण वाचविण्यासाठी संपूर्ण जग काम करत आहे. आपण असे संकट ना कधी पाहिले ना कधी ऐकले होते. हे संकट मानवजातीसाठी  अकल्पनीय तसेच अभूतपूर्व आहे.

पण, निराश होणे, हृदय कमजोर करणे किंवा अस्तावस्त होणे, हे मानवजातीला स्वीकार नाही. आम्ही सतर्क राहून, संकटाचे बारकाईने निरीक्षण करून, संकटात नियमांचे पालन करून, स्व:तचा जीव सांभाळून पुढे वाटचाल करूया. आमचा दृढनिश्चय या संकटातून बाहेर पडण्यास  मदत करेल.

मित्रांनो, आपण मागील शतकापासून ऐकत आलो आहोत की 21 वे शतक हे भारताचे शतक असणार. वैश्विक प्रणाली आणि कोरोना आधी जग कसे होते ते आम्ही बारकाईने निरीक्षण करून पाहिले. कोरोना संकटाचा आघात जगभर पसरला आणि ही परिस्थिती आपण सातत्याने पाहत आहोत. या दोन्ही काळांना भारताच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास 21 वे शतक हे भारताचे आहे असे वाटते. हे आपले स्वप्न नव्हे तर आपल्या सगळयांची जबाबदारी आहे.

पण त्याचा मार्ग कसा असला पाहिजे?

जगातील सद्याची स्थिती आम्हाला (आत्मनिर्भार भारत) “ सॅल्फ रिलायण्ट इंण्डिया” हा एकच मार्ग शिकवते. आमच्या धर्मग्रंथानी देखील तेच म्हटले आहे ईशा: पंथा; म्हणजे- आत्मनिर्भर भारत.

मित्रांनो,

एक राष्ट्र म्हणून आज आम्ही एका निर्णायक टप्प्यावर उभे आहोत. एवढी मोठी आपत्ती ही भारतासाठी एक संकेत आहे त्याने एक संदेश आणि संधी आणली आहे. मी उदाहरणासहीत माझा दृष्टीकोन आपल्यासमोर मांडतो. जेव्हा कोरोना सुरू झाला तेव्हा भारतात एक सुध्दा पीपीई कीट तयार केली नव्हती. भारतात एन-95 मास्क थोड्या प्रमाणात तयार झाले होते. आज स्थिती अशी आहे की, आम्ही एका दिवसाला 2 लाख पीपीई (PPE) आणि 2 लाख एन-95 मास्क तयार करू शकतो आम्ही असे करायला समर्थ आहोत कारण भारताने या संकटाचे रुपांतर एक संधी म्हणून केले आहे.

संकटाला संधीमध्ये रुपांतरीत करणारी- भारताची ही दूरदृष्टी- आत्मनिर्भर भारताच्या दृढनिश्चयात तेवढीच प्रभावी सिध्द होईल.

मित्रांनो,

आज वैश्विक परिदृष्यात आत्मनिर्भर या शब्दाचा अर्थ बदलला आहे. मानव केंद्रीत जागतिकीकरणाविरूध्द अर्थव्यवस्था केंद्रीकृत जगतिकीकरण यावर चर्चा सुरू झाली आहे.भारताची मुलभूत विचारसरणी जगाला एक आशेचे किरण दाखवते. भारताची संस्कृती आणि परंपरा आत्मनिर्भतेविषयी सांगते ज्याचा आत्मा म्हणजे वसुधैवकुटूंबकम् .

जेव्हा आत्मनिर्भरतेचा प्रश्न येतो, तेव्हा भारत आत्मकेंद्रीत व्यवस्थेचे समर्थन करत नाही. भारतातील आत्मनिर्भरता जागतिक आनंद, सहकार्य आणि शांततेत गुंतलेली आहे. हीच ती संस्कृती जी जगाच्या कल्याणावर विश्वास ठेवते, सगळ्या सजीव प्राण्यांना आणि संपूर्ण जगाला एक कुटूंब मानते. हा

परिसर म्हणजे **'माता भूमि: पुत्रो अहम् पृथिव्य:'**- संस्कृती जी पृथ्वीला माता मानते. आणि जेव्हा भारत भूमी आत्मनिर्भर होते तेव्हा ती एका समृध्द जगाच्या सुनिच्छिततेची खात्री देते. भारताची प्रगती सदैव जगाच्या प्रगतीचे एक अविभाज्य घटक आहे.

भारताच्या लक्ष्य आणि कार्यांचा प्रभाव जगाच्या कल्याणावर होतो. जेव्हा भारत उघड्यावर शौच करण्यापासून मुक्त झाला तेव्हा त्याचा प्रभाव जगाच्या प्रतिमेवर झाला. टीबी, कुपोशण, पोलिओ यासारख्या भारतातील मोहिमांचा प्रभाव जगावर झाला.

आंतरराष्ट्रीय सोलार युती ही ग्लोबल वॉर्मिंगविरुध्द भारताची देणगी आहे. आंतरराष्ट्रीय योग दिवसाचा पुढाकार म्हणजे ताण कमी करण्यासाठी जगाला भारताची देणगी आहे. भारतीय औषधांनी जगातील विविध भागातील लोकांना जगण्याची एक नवीन आशा दिली आहे.

या पावलांनी भारताला कीर्ती मिळवून दिली आणि प्रत्येक भारतीय नागरिकाला त्याचा अभिमान वाटतो. जगाला विश्वास वाटतो की, भारत खूप चांगले कार्य करू शकतो, मानवजातीच्या कल्याणासाठी अनेक चांगल्या गोष्टी भारत देऊ शकतो.

प्रश्न असा आहे की- कसे?

या प्रश्नाचे उत्तर म्हणजे- 130 कोटी जनतेचा आत्मनिर्भर भारताचा एकत्रित संकल्प.

मित्रांनो

आमच्याजवळ शेकडो वर्षांचा अभिमानास्पद इतिहास आहे. जेव्हा भारत समृध्द होता, तेव्हा भारतास सोन्याची खाण असे संबोधले जात असे, देश समृद्ध होता तेव्हा नेहमी जगाच्या कल्याणाच्या मार्गानेच पुढे-पुढे जात राहीला.

त्यानंतर काळ बदलला देश गुलामगिरीच्या साखळीत सापडला, आम्ही विकासापासून दूर राहिलो. आज, जेव्हा भारत जलद गतीने उन्नतीच्या पायऱ्या चढत असला तरी वैश्विक कल्याणाच्या उद्दीष्टांसाठी तो कटीबध्द आहे. लक्षात ठेवा, या शतकाच्या सुरुवातीस Y2K च्या संकटातून भारतातील तंत्रज्ञानातील विशेषतज्ञांनी जगास बाहेर काढले. आज आमच्याजवळ संसाधने आहेत आमच्याजवळ सामर्थ्य आहे आणि आमच्याजवळ जगातील उत्कृष्ट अशी प्रतिभा आहे.

आम्ही चांगले उत्पादन तयार करणार, आम्ही आमची गुणवत्ता अधिक सुधारणार, पुरवठा शृंखला अधिक आधुनिक करणार, आम्ही हे करू शकतो आणि आम्ही नक्की करणार.

मित्रांनो, मी कच्छ येथे झालेला भूकंप अनुभवला आहे. सगळीकडे पडझड झाली होती. सगळे नष्ट झाले होते. कच्छ मरणाची चादर घेऊन झोपला आहे असे भासत होते. त्या परिस्थितीत कोणी परिस्थिती बदलणार असा विचार केला नव्हता. पण, कच्छ पुन्हा पुर्वपदावर आले, कच्छने पुढे जाण्यास सुरूवात केली कच्छ पुढे गेला ही भारतीयांची हिंमत आणि दृढसंकल्प आहे.

दृढसंकल्प केल्यास आम्ही ध्येयापर्यंत पोहोचणार आणि कोणताही मार्ग कठीण असणार नाही. आणि जेथे इच्छा आहे तेथे मार्ग आहे. तो म्हणजे आत्मनिरर्भर भारत. आमचा एकत्रित संकल्प प्रबळ आहे ज्यामुळे भारत आत्मनिर्भर होऊ शकतो.

मित्रांनो, आत्मनिर्भर भारताची ही भव्य इमारत पाच स्तभांवर उभी असणार.

**पहिला स्तंभ म्हणजे अर्थव्यवस्था**, अर्थव्यवस्था जी वृध्दिशील परिवर्तनापेक्षा खूप मोठे परिवर्तन घडवते.

**दुसरा स्तंभ म्हणजे साधनसुविधा**, साधनसुविधा जी आधुनिक भारताची ओळख होणार.

**तिसरा स्तंभ म्हणजे आमची प्रणाली**, प्रणाली जी तंत्रज्ञानावर संचलित आहे जी 21 व्या शतकाचे स्वप्न पूर्ण करू शकते  मागील शतकाच्या धोरणावर आधारीत नसलेली प्रणाली.

**चौथा स्तंभ म्हणजे आमची जनसंख्या आहे**. आमची व्हायब्रंट जनसंख्या जगातील सगळयात मोठ्या लोकशाहीची ताकद आहे. आत्मनिर्भर भारतासाठी एक उर्जा स्त्रोत आहे.

**आमचा पाचवा स्तंभ म्हणजे मागणी**. आमच्या अर्थव्यवस्थेतील मागणी आणि पुरवठा शृंखलेची शक्ती त्याच्या क्षमतेप्रमाणे वापरणे आवश्यक आहे. देशात मागणी वाढविण्यासाठी आणि मागणी पूर्ण करण्यासाठी आमच्या पुरवठ्यातल्या साखळीतील प्रत्येक भागधारकाला सशक्त करण्याची आवश्यकता आहे. आपल्या पुरवठा प्रणालीला मातीच्या वासाने आणि पुरवठा साखळीला कामगारांच्या घामाने मजबूत करू.

मित्रांनो, या कोरोना संकटात, आज मी एका नव्या संकल्पासह एका विशिष्ट आर्थिक पॅकेजची घोषणा करणार आहे. हा आर्थिक पॅकेज **'आत्मनिर्भर भारत अभियान' (सॅल्फ रिलायण्ट इंण्डिया कॅम्पेन)** हे एक महत्वपूर्ण लिंक म्हणून काम करेल.

मित्रांनो, कोरोना संकटासंबंधित हल्लीच सरकारने केलेल्या आर्थिक घोषणेत रिझर्व्ह बँकेचा निर्णय होता. आज घोषित केलेली आर्थिक पॅकेज जर जोडली तर ती सुमारे 20 लाखापर्यंत होईल. ही पॅकेज भारताच्या जीडीपीच्या सुमारे 10 टक्क्यापर्यंत आहे. या देशातल्या वेगवेगळया विभागांसह आणि आर्थिक प्रणालीशी संबंधित असलेल्या लोकांना 20 लाख कोटी रुपयांचा आधार मिळेल. हे पॅकेज 2020 मध्ये देशातील विकासाच्या प्रवासाला नवा वेग आणि आत्मनिर्भर भारत अभियानाला नवी दिशा देईल. आत्मनिर्भर भारताच्या संकल्पाला सिध्द करण्यासाठी पॅकेजमधल्या भूमी, श्रम, द्रवता आणि कायदा या सर्वांवर भर दिला आहे.

ही आर्थिक पॅकेज आमच्या कॉटेज उद्योग, गृह उद्योग, लघु उद्योग, ऍमऍसऍमई यासाठी जे लाखो लोकांच्या उपजिविकेचे स्त्रोत आहे, जे आत्मनिर्भर भारतासाठी आमच्या संकल्पाची मजबूत पाया आहे. ही आर्थिक पॅकेज देशातल्या त्या कामगारांसाठी, शेतकऱ्यांसाठी आहे जे कोणत्याही परिस्थितीत तसेच प्रत्येक हंगामात देशवासियांसाठी दिवस रात्र काम करतात.  हे पॅकेज देशातल्या

मध्यम वर्गीयांसाठी आहे जे प्रमाणिकपणाने कर भरतात आणि देशाच्या विकासाला योगदान देतात. हे आर्थिक पॅकेज भारतीय उद्योगासाठी आहे जे भारताच्या आर्थिक क्षमतेला प्रोत्साहन देण्यासाठी दृढ आहेत. उद्यापासून, पुढील काही दिवासात अर्थमंत्री तुम्हाला 'आत्मनिर्भर भारत अभियान' अशा प्रेरीत केलेल्या आर्थिक पॅकेजविषयी सविस्तर माहिती देतील.

मित्रांनो, आता भारताला आत्मनिर्भर भारत करण्यासाठी अभूतपूर्व सुधारणीच्या वचनबध्दतेने देशाने पुढे जाणे आवश्यक आहे. गेल्या 6 वर्षांमध्ये केलेल्या सुधारणांच्या परिणामांचा अनुभव तुम्हीही घेतला आहे, आज या संकटाच्या काळातसुध्दा, भारताची व्यवस्था अधिक सक्षम दिसते. अन्यथा, भारत सरकारने पाठविलेले पैसे, थेट गरीब शेतकऱ्यांच्या खिशात जाईल असा विचार कोणी केला असेल का! पण असे झाले आहे.  असे घडले तेव्हा सर्व सरकारी कार्यालये बंद होती, वाहतूक साधने बंद होती. जनधन-मोबाईल-JAM त्रिशक्तीशी संबंधित ही फक्त सुधारणा होती, ज्याचा परिणाम आम्ही हल्लीच पाहिला आहे. आता एक नवीन उंची देत सुधारणांची व्याप्ती विस्तृत करावी लागेल. ही सुधारणा शेतासंबंधित पूर्ण पुरवठेच्या शृंखलेत असेल, जेणेकरून शेतकरी सशक्त होईल आणि भविष्यात कोरोनासारख्या संकटात देखील शेतावर त्यांचा कमी प्रभाव पडेल. ही सुधारणां रॅशनल, टॅक्स प्रणाली, साधी आणि सरळ नियम आणि कायदे, चांगली साधनसुविधा, समर्थ आणि सक्षम मानव संसाधन, आणि मजबूत वित्तीय प्रणाली निर्माण करण्यासाठी असेल. ही सुधारणा व्यापाराला प्रोत्साहीत करेल, गुंतवणुकीला आकर्षित करेल आणि मेक इन इंण्डियाच्या संकल्पाला मजबूत करेल.

मित्रांनो, आत्मनिर्भरता फक्त आंतरीक शक्ती आणि आत्म-विश्वासाच्या माध्यमातून शक्त आहे. तसेच आत्मनिर्भरता देशाला वैश्विक पुरवठा शृंखलेत कठीण स्पर्धेसाठी तयार करते.  भारताने पुरवठा शृंखलेत मोठी भूमिका पार पाडणे ही सध्या काळाची गरज आहे. हे लक्षात ठेवून आर्थिक पॅकेजमध्ये

अनेक तरतूदी केल्या आहेत. यातून आमच्या सर्व क्षेत्रांची कार्यक्षमता वाढेल आणि गुणवत्ता सुनिश्चित होईल.

मित्रांनो, हे संकट इतके व्यापक आहे की, सगळ्यात मोठी वेवस्था हलली आहे. पण, अशाही परिस्थितीत, देशातील गरीब बंधू आणि भगिनी विशेष म्हणजे रस्त्यावर विक्री करणारे, फेरीवाले, कामगार, घराघरो जाऊन काम करणारे यांचा संकल्प आणि संयम बघितला आहे, त्यांनी या काळात अनेक तपस्या केली, खूप त्याग केला आहे. असे कोण आहेत ज्यांना त्यांची अनुपस्थिती जाणवली नाही? आता त्यांना खंबीर करणे आमचे कर्तव्य आहे. हे लक्षात धरून, मग ते गरीब, कामगार, स्थलांतरीत कामगार, पशुपालक, मासेमार, संघटित क्षेत्र असो वा असंघटित क्षेत्र असो, प्रत्येक घटकाला आर्थिक पॅकेजमध्ये काही महत्वपूर्ण निर्णय जाहीर केले जाईल.

मित्रांनो, कोरोना संकटात आम्हाला स्थानिक उत्पादन, स्थानिक बाजार, स्थानिक पुरवठा शृंखला यांचे महत्व पटवून दिले आहे. या संकटाच्या काळात, स्थानिकांनीच आमची मागणी पूर्ण केली आहे. स्थानिकांनीच आम्हाला सांभाळले आहे. स्थानिक फक्त गरज नाही तर, आमची जबाबदारी आहे. काळाने आम्हाला शिकविले की स्थानिकांचा आम्ही आमच्या जीवनाचा मंत्र म्हणून स्वीकारले पाहिजे. आज जे वैश्विक ब्रँड आहेत ते सुध्दा कधी तरी असेच स्थानिक होते. पण जेव्हा लोक त्यांचा वापर करू लागले, तेव्हा त्यांनी त्याचा प्रचार केला, ब्रँड केले, त्यांचा अभिमान वाटला, आणि ती उत्पादने स्थानिक(local) पासून वैश्विक(global) झाली. म्हणूनच, फक्त स्थानिक उत्पादने खरेदी करण्यासाठी नव्हे तर अभिमानाने त्यांचा प्रचार करण्यासाठी सुध्दा आज प्रत्येक भारतीयाला local साठी vocal व्हावे लागले. आमचा देश असे करू शकेल असा मला विश्वास आहे. तुमच्या प्रयत्नांनी दर वेळी तुमच्याबद्दल माझा आदर वाढला आहे. मला अभिमानाने एक गोष्ट आठवते. जेव्हा मी तुम्हाला आणि देशाला खादी खरेदी करण्यासाठी विनंती केली होती आणि देशातल्या हातमाग कामगारांना आदर करायला सांगितले होते. आज अल्प काळाच्या आत खादी आणि हातमाग

दोन्हींची मागणी आणि विक्री रिकॉर्ड स्तरावर पोहोचली आहे. एवढेच नाही तर, तुम्ही त्याला एक ब्रँड केला आहे. हा फक्त एक लहान प्रयत्न होता, पण त्याचा परिणाम उत्तम होता.

मित्रांनो, विशेषज्ञ आणि वैज्ञानिक सांगतात की, कोरोना दीर्घकाळासाठी आमच्या जीवनाचा भाग म्हणून राहील. तसेच, आपले आयुष्य फक्त कोरोना भोवतीच मर्यादीत राहील असेही आम्ही होऊ देऊ नये. आम्ही मास्क घालून, दोन फुटांचे अंतर ठेवून आमचे लक्ष्य साध्य करणार. यासाठी, लॉकडाऊनचा 4 था टप्पा, लॉकडाऊन 4 पूर्णपणे नव्या नियमांसह नव्या रुपाचा असेल. राज्यातून आम्हाला मिळालेल्या सूचनां आधारे लॉकडाऊन 4 संबंधित माहिती तुम्हाला 18 मे च्या अगोदर देण्यात येईल. आम्ही कोरोनाविरुध्द लढून पुढे जाणार असा मला विश्वास आहे.

मित्रांनो, आमच्या संस्कृतीत सांगितल्याप्रमाणे **'सर्वम् आत्म वशं सुखम्'** अर्थात, जे आमच्या हातात आहे, जे आमच्या नियंत्रणात आहे तेच म्हणजे सूख. आत्मनिर्भरता आम्हाला सुख, आनंद देते त्याचबरोबर सशक्त करते. 21 वे शतक भारताचे शतक म्हणून पूर्ण करण्याची जबाबदारी आत्मनिर्भर भारताच्या शपथेतूनच पूर्ण होईल. या जबाबदारीला 130 कोटी नागरिकांच्या प्राणशक्तीतूनच ऊर्जा प्राप्त होऊ शकते. आत्मनिर्भर भारताचे हे युग, प्रत्येक भारतीयाठी नवे व्रत, नवे पर्व असेल. नव्या संकल्प आणि दृढनिश्चयाने आम्ही पुढे सरले पाहिजे. आमचे आचार-विचार कर्तव्य भावनेने भरलेले आहे, पूर्णत्वाची कार्यसक्ती आहे, कौशल्याचे भांडवल आहे तर आत्मनिर्भर भारत होण्यासाठी आम्हाला कोण आडवू शकतात? आम्ही भारताला आत्मनिर्भर करणारच. या संकल्पासह, या विश्वासाने मी तुम्हाला शुभेच्छा देतो.

**आत्मनिर्भर भारत**

**अन्न उद्योगात सूक्ष्म ऍण्टरप्राईजच्या उन्नतीसाठी संधी**

**वोकल फॉर लोकल**

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (पीऍम ऍफऍमई योजना)

अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय

भारत सरकार

**अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय**
**भारत सरकार**

आत्मनिर्भर भारत अभियानाच्या अतंर्गत सूक्ष्म अन्न उद्योजकांसाठी, एफपीओ/ एसएचजीएस/ सहकारी संस्थाना 2 लाख सूक्ष्म प्रक्रिया ऍण्टरप्राईज औपचारिक करण्यासाठी रू.10000/- कोटींच्या योजनेचा लाभ मिळवून देण्याची सुवर्णसंधी प्रदान करणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

130 करोड नागरिकांचा भारताला आत्मनिर्भर करण्याचा संयुक्त संकल्प आहे. या संकल्पाचा मार्ग हा स्थानिकतेमध्ये आहे- स्थानिक उत्पादन, स्थानिक बाजारपेठ, स्थानिक पुरवठा साखळी . स्थानिकतेचा अवलंब ही केवळ आवश्यकता नसून तर ती जबाबदारी आहे.

**नरेंद्र मोदी, प्रधानमंत्री**

**हरसिमरत कौर बादल**
अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री

**रामेश्वर तेली**
अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री

## 1. पार्श्वभूमी

1.1 असंघटित अन्न प्रकिया क्षेत्र हे जवळपास 25 लाख युनिटमध्ये समाविष्ट झालेले आहे जे अन्न प्रक्रिया क्षेत्रामध्ये 74% रोजगारांचे योगदान देते. या युनिटमधील जवळपास 66% टक्के युनिट हे ग्रामीण क्षेत्रात स्थित आहे आणि सुमारे 80% उद्योजक हे ग्रामीण क्षेत्रातील असून ते प्रामुख्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात आणि त्यांचे नागरी क्षेत्राकडे होणारे स्थलांतर यामुळे आटोक्यात आलेले आहे. सदर युनिट हे मुख्यत: सूक्ष्म उद्योजकाच्या विभागात येते.

1.2 सदर युनिट हे विविध आव्हांनाना सामोरे जात असल्याने त्याची क्षमता व वाढ मर्यादित होते. आधुनिक तंत्रज्ञान व उपकरणाच्या प्रवेशाचा अभाव, प्रशिक्षण, संस्थात्मक उधारीचा प्रवेश, उत्पादनांच्या गुणवत्ता नियंत्रणावर असलेला सामान्य जागरूकतेचा अभाव, ब्रँडिंग आणि विपणन कौशल्याचा अभाव अशा अनेक आव्हानांचा यामध्ये समावेश होतो. त्यासाठी, अन्न प्रकिया क्षेत्राकडे प्रचंड क्षमता असूनही मूल्यवर्धक आणि आऊटपूटच्या संदर्भामध्ये त्याचे योगदान हे अल्प आहे.

## 2. उद्दिष्टे

2.1 असंघटित अन्न प्रक्रिया ऍण्टरप्राईजचे योगदान आणि आव्हांनांना सामोरे जाताना त्यांच्या क्षमतेला निर्माण होणारा व्यत्यय याची दखल घेऊन अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने (एमओएफपीआय) “प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया ऍण्टरप्राईज औपचारीकरण योजना- (पीऍम

ऍफऍमई योजना)” सुरू केली आहे ज्याद्वारे पॅकेज साहाय्य आणि सेवा दिली जाते. योजनेच्या अंतर्गत असलेली उद्दिष्टे खालील प्रमाणे -

(i) तांत्रिक ज्ञान, कौशल्य प्रशिक्षण आणि आधारभूत साहाय्य सेवांद्वारे उद्योजकांची क्षमता वाढविणे;

(ii)तांत्रिक अद्ययावती करण्यासाठी विद्यमान असलेल्या सूक्ष्म अन्न प्रक्रियांना सहजरित्या उधारी वाढवून देणे;

(iii) शेतकरी निर्माण संघटना (एफपीओ), स्वयं साहाय्य गट (एसएचजीएस), सहकारी आणि सहकारी संस्थेचे निर्माते तसेच सूक्ष्म उद्योजकांना सक्षम करणारे त्यांचे संपूर्ण मूल्यवर्धक साखळींना सामान्य सेवांचा लाभ करण्यास साहाय्य करणे.

| English | Marathi |
|---|---|
| 25 Lakh unorganised food processing units contributes to | असंघटित अन्न प्रक्रियेच्या क्षेत्रामध्ये 25 लाख युनिट्सचे योगदान |
| 74% of employment in food processing sector | अन्न प्रक्रिया क्षेत्रात 74% रोजगारांना योगदान दिलेले आहे |

iv) नियामक चौकट आणि अनुपालन यांच्या अंतर्गत नोंदणीकरण करण्यासाठी विद्यमान उद्योजकांचे औपचारिक चौकटीमध्ये येणाऱ्या अवस्थांतरासाठी साहाय्य करणे;

v) संघटित पुरवठा करणाऱ्या साखळीत एकत्रीकरण करून ब्रँडिंग आणि विपणन सशक्त करणे.

## 3. राज्यांचा/ केंद्रशासित प्रदेशांची व्याप्ती आणि निधी स्वरूप

3.1. ही एक अखिल भारतीय केंद्रीय प्रायोजित योजना आहे ज्यात 2020-21 ते 2024-25 पर्यंत या 5 वर्षांसाठी 2,00,000 ऍंण्टरप्राईजांचा समावेश करण्यासाठी रू. 10,000 कोटी रुपयांचा परिव्यय आहे. या योजनेच्या अंतर्गत केंद्रीय सरकार आणि राज्य सरकारमध्ये 60:40 प्रमाण, उत्तर पूर्व आणि हिमालयीन राज्यांसाठी 90:10 प्रमाण, विधीमंडळ असलेले केंद्रशासित राज्ये यांना 60:40 प्रमाण आणि अन्य केंद्रशासित प्रदेशांसाठी केंद्राकडून 100% प्रमाणे खर्च समायिक केला जाईल.

3.2. 2020-21 या पहिल्या वर्षामधील खर्च केंद्र किंवा राज्यांनी खर्च केलेला असल्यास त्याचा 100% खर्च केंद्र सरकारातर्फे करण्यात येईल. पहिल्या वर्षासाठी केलेला खर्च हा वरील निधीमध्ये उल्लेख केलेल्या प्रमाणानुसार समयोजित केला जाऊन पुढील चार वर्षांमध्ये अन्य राज्यांनी हस्तांतरित केला जाईल.

| | |
|---|---|
| Ministry of Food Processing Industries Government of India | अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय<br><br>भारत सरकार |
| Fund Sharing Pattern Between Center & State | केंद्र आणि राज्यांमध्ये निधी वाटणी |
| State | राज्य |
| Center | केंद्र |
| 40 | 40 |
| 10 | 10 |
| 60 | 60 |
| 90 | 90 |
| 100 | 100 |
| States & UTs with legislature | विधीमंडळ असलेली राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश |
| Himalayan & North Eastern States | हिमालयी आणि उत्तर पूर्व राज्ये |
| UTs without legislature | विधीमंडळ नसलेले केंद्रशासित प्रदेश |

3.3 योजने अंतर्गतचा निधी मान्य प्रकल्प अंमलबजावणी आराखड्याच्या (पीआयपी) आधारावर राज्यांना दिला जाईल.

## 4.एक जिल्हा एक उत्पादन दृष्टीकोन

4.1 ही योजना एक जिल्हा एक उत्पादन या दृष्टिकोनाचा अंगीकार करून साधनांची खरेदी, सामान्य सेवा आणि उत्पादनांचे विपणनच्या संदर्भात लाभ प्राप्त करून घेण्याची संधी देते. एक जिल्हा एक उत्पादन या दृष्टिकोनाने मूल्यवर्धक साखळींचा विकास आणि पायाभूत सुविधेच्या सेवेला साहाय्य करून एकरेखित करण्यासाठीची चौकट प्रदान करते. एका जिल्हातील एका उत्पादनासाठी एकाहून अधिक क्लस्टर असू शकेल. एका क्लस्टरचा विस्तार एका जिल्ह्याहून अधिक असू शकतो. योजनेचे लक्ष त्वरित नष्ट होणाऱ्या उत्पादनावर असेल या दृष्टिकोनातून राज्य जिल्ह्यासाठी अन्न उत्पादनाची ओळख करून देईल. ओडीओपी शेती-उत्पाद, अन्नधान्य आधारित उत्पादन किंवा जिल्ह्यामध्ये आणि संबंधित क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उत्पादित केलेले अन्न उत्पादन त्वरित नष्ट होणारी असू शकते. अशा उत्पादनांच्या सचित्र यादीमध्ये आंबा, बटाट, लिची, टोमॅटो, साबूदाणा, किन्नी, भुजिया, पेठा, पापड, लोणचे, ज्वार आधारित उत्पादन, मत्सालय, कुक्कुटपालन, मांस तसेच पशू अन्न इतरांबरोबर अशा उत्पादनांचा समावेश आहे. अस्तित्वात असलेल्या व्यक्तिगत सूक्ष्म उद्योगांच्या समर्थनाच्या संबंधात ओडीपीच्या दृष्टिकोनानुसार उत्पादन करणाऱ्यांना प्राथमिकता दिली जाईल. तसेच, युनिट्स निर्माण करणारी अन्य उत्पादनांनाही साहाय्य केले जाईल. गटाच्या बाबतीत, प्रभावीरूपात, ओडीपीच्या दृष्टिकोणातंर्गत असलेल्या उत्पादनात समावेश असलेल्या उद्योगांना साहाय्य दिले जाईल. जे अशा प्रकारची उत्पादनाची प्रक्रिया पहिल्या पासूनच करीत आलेले आहे आणि ज्यांच्याकडे पर्याप्त तांत्रिक वित्तीय किंवा उद्योग क्षमता आहे केवळ त्या जिल्ह्यातील अन्य उत्पादनांचे प्रक्रिया करत असलेल्या समूहांनाच साहाय्य दिले जाईल. केवळ ओडीपीच्या दृष्टिकोनातंर्गत उत्पादनासाठी सामान्य पायाभूत सुविधा आणि ब्रँडिग व विपणनासाठी साहाय्य दिले जाईल. राज्य किंवा प्रादेशिक स्तरावर विपणन आणि ब्रँडिगसाठीच्या साहाय्यते बाबतीत, जिल्ह्यामधील उत्पादन जे ओडीओपीच्या कक्षेत येणारे नसले तरीही त्या उत्पादनाचा समावेश केला जाऊ शकतो.

4.2 या योजनमध्ये बॅकवर्ड आणि फॉरवर्ड लिंकेजसना सशक्त करणे, सामान्य सुविधांची तरतूद, इनक्यूबेशन केंद्रे, प्रशिक्षण, आर ॲण्ड डी, विपणन आणि ब्रँडिग, या तरतूदी प्रामुख्याने

ओडीओपीच्या उत्पादनासाठी असलेली साहाय्यताही प्रदान करेल. पुढे, हा दृष्टिकोन सरकारचा विद्यमान प्रचारात्मक प्रयत्नाला पूरक आणि लाभदायक ठरेल जसे कृषी निर्यात धोरणांतर्गत कृषी क्लस्टर पीकाचा विकास, राष्ट्रीय शहरी ग्रामीण मिशनाद्वारे कृषी मंत्रालय आणि ग्रामीण विकास मंत्रालयचा क्लस्टर दृष्टिकोन महत्त्वपूर्ण आहे.

## 5.अन्न प्रक्रिया युनिटांसाठी साहाय्य

अन्न प्रक्रिया युनिटांसाठी केले जाणारे साहाय्य खालील प्रमाणे:

(i) अद्ययावत करण्यासाठी विद्यमान असंघटित अन्न प्रक्रिया युनिटांच्या प्रकल्प खर्चाला 35% क्रेडिट लिंक साहाय्य असून त्यासाठी अधिकतर 10 लाख रूपयापर्यंतचे अनुदान साहाय्य प्रदान केली जाईल.

(ii) विहित केलेल्या अधिकतर मर्यादेसह भांडवल खर्चासाठी एसएचजीएस/एफपीओएस/सहकारी यांना प्रकल्प खर्च 35% क्रेडिट लिंक अनुदान दिले जाईल.

(iii) अन्न प्रक्रियेत कार्यकारी भांडवल म्हणून गुंतलेल्या प्रति सदस्याला @ रू.40,000/- बीज भांडवल दिले जाईल.

(iv) विहित केलेल्या अधिकतर मर्यादेसह भांडवल खर्च पायाभूत सुविधेसाठी प्रकल्प खर्च 35% क्रेडिट लिंक अनुदान दिले जाईल.

(v) विहित केलेल्या अधिकतर मर्यादेसह विपणन आणि ब्रँडिंग 50% पर्यंतचा खर्चाचे साहाय्य केले जाईल.

## 6. प्रक्रिया युनिटांचा विस्तार

6.1. वैयक्तिक विभाग: व्यक्तिगत सूक्ष्म अन्न प्रक्रियेचा विस्तार /तंत्रज्ञानांच्या विस्तारीकरणासाठी पात्रता प्रकल्प खर्च हा 35% च्या दराप्रमाणे क्रेडिट लिंक भांडवल अनुदानाचा लाभ घेऊ शकतो ज्याचे अधिकतर 10 लाख रूपये प्रति युनिटसाठी असेल. लाभार्थीचे योगदान किमान 10% असले पाहिजे आणि उर्वरित राशी बँकमध्ये कर्ज असले पाहिजे.

### 6.1.1 पात्रता निकष:

(i) ऍण्टरप्राईजच्या मालकी हक्कासह व्यक्तिगत/ भागीदारी असलेले फर्म;

(ii) संसासधन व्यक्तीद्वारे सर्वेक्षण किंवा सत्यापित केलेले विद्यमान सूक्ष्म अन्न प्रक्रिया युनिट्स;

(iii) अर्जदार हा 18 वर्षांच्या वर असला पाहिजे आणि किमान इयत्ता आठवी उत्तीर्ण झालेली अशी त्याची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे;

(iv) एका कुटुंबातील केवळ एक व्यक्ती आर्थिक साहाय्य प्राप्त करण्यास पात्र असेल. या प्रयोजनासाठी ‘कुटुंबा’ मध्ये स्वत:, पत्नी आणि मुले यांचा समावेश असेल.

### 6.1.2. विस्तारीकरणासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया:

6.1.2.1 या योजने अंतर्गत फायदांचा लाभ घेणारे इच्छूक युनिटांसाठी जिल्हा पातळीवर अर्ज आमंत्रित केले जाईल. योजनेच्या अंतर्गत साहाय्य शोधणारे इच्छूक विद्यमान अन्न प्रक्रिया युनिटसनी एफएमई पोर्टलवर अर्ज करावा. छाननी झाल्यानंतर कर्जाचा प्रस्ताव बँकेकडे शिफारस करण्यात येईल. बँकेला शिफारस केलेल्या अर्जांची लघु यादी करण्यासाठी राज्य योग्य स्तर निवडू शकते.

### 6.1.3. **अनुदानासाठी बँकेकडे केली जाणारी प्रक्रिया:**

6.1.3.1 राष्ट्रीय स्तरावर, बँकाना अनुदान वितरीत करण्यासाठी आणि लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी बँकाशी संपर्क साधून नोडल बँक नियुक्त केली जाईल. कर्जाला मंजूरी देणारी बँक लाभार्थ्यांच्या नावावर आणखीन एक खाते उघडेल. केंद्र आणि राज्य सरकारद्वारे 60:40 च्या प्रमाणाप्रमाणे अनुदान क्रमश: केंद्र आणि राज्य सरकार कर्ज देणाऱ्या बँकांमध्ये लाभार्थ्याच्या खात्यात जमा केले जाईल. कर्जाचे अंतिम हफ्यातील वितरण झाल्यानंतर तीन वर्षे अवधीच्या पश्चात लाभार्थी या अवधी पर्यंत हप्ता व व्याज योगरित्या भरत असेल व युनिट्स कार्यरत असले, तरच हा निधी लाभार्थ्याच्या बँक खात्यात जमा केली जाईल. तसेच याच तत्त्वाचे अनुसरून करून समूह आणि सामान्य पायाभूत सुविधा यांना अनुदान त्यांच्या बँक खात्यात जमा केला जाईल.

| | |
|---|---|
| Units interested in availing the benefits | लाभ घेण्यासाठी इच्छूक युनिट्स |
| Assistance from District Resource Persons | जिल्हा संसाधन व्यक्तींकडून साहाय्य |
| Sending the Application | अर्ज पाठविणे |
| Approval from District Level Committee or State Nodal Agency | जिल्हा स्तरीय समिती किंवा राज्य नोडल एजन्सीकडून मंजुरी |
| Recommendation to the banks | बँकांना शिफारस |

6.2 **गट वर्गवारी:** योजना कल्सटरामध्ये ते गट जसे एफपीओएस/एसजीएस/ सहकारी उत्पादक तसेच त्यांची पूर्ण मूल्य साखळीला साहाय्य प्रदान करेल. एफपीओएस/एसजीएस/ सहकारी उत्पादकांना खालील साहाय्य दिले जाईल:-

(i) विहित केलेल्या अधिकतर मर्यादेसह भांडवल गुंतवणूकीसाठी 35% क्रेडिट लिंक अनुदान दिले जाईल.

(ii) प्रशिक्षण साहाय्य

(iii) ओडीओपीच्या अंतर्गत सामान्य ब्रँण्ड विकसित करण्यासाठी विपणन आणि ब्रँडींगसाठी साहाय्य केले जाईल.

**6.2.1 पात्रता निकषः**

(i) किमान तीन वर्षांसाठी ओडिओपी उत्पादनाच्या प्रक्रियेत असले पाहिजे;

(ii) एफपीओ /सहकारीच्या बाबतीत, त्यांची किमान उलाढाल रु.1 कोटी असली पाहिजे आणि प्रस्तावित केलेला प्रकल्प खर्च सद्याच्या उलाढालीपेक्षा अधिक असू नये.

(iii) एसएचजी/ सहकारी/ एफपीओ प्रकल्प खर्चाचा 10 % पूर्ण करण्यासाठी पुरेशी आंतरिक संसाधने आणि कार्यरत भांडवलासाठी सिमीत पैसे असले पाहिजे.

## 6.3. स्वंय सहाय्य गटासाठी बीज भांडवलः

योजनेत कार्यरत भांडवल आणि छोट्या साधानांच्या खरेदीसाठी अन्न प्रक्रियेतील एसएचजीमध्ये गुंतलेल्या प्रति सदस्याला रू. 40,000 बीज भांडवलाची तरतूद केलेली आहे. अनुदानाच्या रूपात बीज भांडवल एसएचजीच्या फेडरेशनच्या स्तरावर प्रदान केले जाईल जे पुढे एसएचजीद्वारे कर्जाच्या रूपात सदस्यांना दिले जाईल.

## 6.3.2 पात्रता निकष:

6.3.2.1 बीज भांडवलासाठी, सद्या अन्न प्रक्रियेत कार्यरत असलेले केवळ एसएचजीचे सदस्य पात्र ठरेल. त्याचबरोबर कार्यरत भांडवल छोट्या साधनांच्या खरेदी करण्यासाठी एसएचजी सदस्यालासुध्दा या रकमेचा वापर करण्यास प्रतिबध्द असले पाहिजे आणि या संदर्भात एसएचजी आणि एसएचजी फेडरेशनला वचनबध्द राहिले पाहिजे.

## 7. सामान्य साधन सुविधा निर्माण करणे

7.1 सामान्य साधन सुविधा, तसेच सामान्य प्रक्रिया सुविधा, उष्मायन केंद्र, प्रयोगशाळा, कोठार, शीतसाठा इत्यादी तयार करण्यासाठी एफपीओएस/एसजीएस/ सहकारी उत्पादक, राज्य एजन्सी किंवा खासगी ऍण्टप्राईजांना साहाय्य केले जाईल. या विभागातंर्गत प्रकल्पाची पात्रता ही मोठ्या प्रामाणत शेतकऱ्यांना आणि उद्योगांच्या लाभानुसार, व्यवहार्यता अंतर, खासगी गुंतवणूकाची अनुपस्थिती, मूल्य साखळी ही महत्त्वपूर्णतेच्या आधारावर ठरविले जाईल. विहित केल्याप्रमाणे अधिकतर 35% क्रेडिट लिंक अनुदान उपलब्ध असेल.

## 8. ब्रँडींग आणि विपणन साहाय्य

8.1 एफपीओएस/एसजीएस/सहकाऱ्यांना ब्रँडींग आणि विपणन किंवा अन्न प्रक्रिया ऍण्टरप्राईजच्या एसपीव्ही योजने अंतर्गत सामान्य पॅकेजिंग आणि ब्रॅडींगचा विकास साधण्यासाठी अंगिकारलेला क्लस्टर दृष्टिकोन गुणवत्ता नियंत्रण, मानकीकरण आणि ग्राहक किरकोळ विक्रीसाठी अन्न सुरक्षा मापदंडाचे पालन करण्याच्या तरतुदीसह साहाय्य प्रदान केले जाईल.

8.2 विपणन आणि ब्रँडिंगसाठी कमीत कमी मात्रेची आवश्यकता आहे ज्यातून मोठ्या प्रमाणात उत्पादकांना एकत्रित करण्यासाठी एसपीओ/एसएचजी/ सहाकाराऱ्यांच्या सक्रिय भागीदाराच्या माध्यमातून उत्पन्न केले जाऊ शकते. त्यांनी प्रकल्पाविषयी आवश्यक तपशील दर्शविणारा डीपीआर तयार केलेल्या आधारावर साहाय्य दिले जाईल. विपणन आणि ब्रँडिंगच्या प्रस्ताव हेतू डीपीआर तयार करण्यासाठी राज्य नोडल एजन्सीतर्फे रू. 5 लाख पर्यंत साहाय्य केले जाईल.

8.3 विपणन आणि ब्रँडिंगला साहाय्य करण्यासाठी विहीत केलेला एकूण खर्च किमान मर्यादेसह 50% पर्यंत सिमीत राहील. राष्ट्रीय स्तरावर व्हर्टिकल उत्पादनासाठी राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावरील संस्था किंवा संघटना किंवा विपणन आणि ब्रँडिंगसाठी असलेले भागीदार संस्थांना साहाय्य केले जाईल. योजने अंतर्गत किरकोळ आउटलेटस उघडण्यास साहाय्य प्रदान केले जाणार नाही.

## 8.4 सहाय्यासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया

8.4.1 एसएचजी/एफपीओस/ सहकारी यांच्या बाबतीत किंवा योजने अंतर्गत विपणन आणि ब्रँडिंगसाठी एसपीव्ही अर्ज करण्यास इच्छूक असल्यास डीपीआर तयार करून तो राज्य नोडल एजन्सीकडे (एसएनए) सुर्पुद करावा. राज्य स्तरीय मान्यता समिती (एसएलएसी) च्या शिफारसीनुसार एमओएफपीआयपासून मान्यता घेतल्यानंतर एसएनए प्रस्तावाचे मूल्यामापन करेल. त्यानंतर, सदर प्रस्ताव हा कर्जाच्या मंजूरासाठी बँकेकडे शिफारस केले जाईल. सामान्य पायाभूत सुविधाच्या निर्मितीसाठी, सहाय्यासाठी, प्रस्तावासाठी हीच प्रक्रिया पाळली जावी.

## 9. क्षमता निर्माण आणि संशोधन

9.1 तांत्रिक अद्यायावत करण्यासाठी आणि सूक्ष्म अन्न प्रक्रिया एँण्टरप्राईज निश्चित करण्यासाठी प्रशिक्षण हा महत्त्वाचा भाग आहे. प्रत्येक लाभार्थी आणि अनुदान प्राप्त करणारी संस्था त्यांच्या कौशल्याचे अद्ययावतीकरण करण्यास त्यांना प्रशिक्षण दिले जाईल. या व्यतिरिक्त, अन्य विद्यमान लाभार्थी युनिट्सना आणि जिल्ह्यात ओडीओपी उत्पादनाची निर्मीती करणाऱ्या समूहांना , जरी त्यांना क्रेडिट लिंक अनुदानाद्वारे साहाय्य केले जात नसले तरीही

त्यांना प्रशिक्षण साहाय्य दिले जाईल. विपणन आणि ब्रँडिंग यांचा भाग व साहाय्य करणाऱ्या युनिट्सना किंवा अशा नेटवर्कना जोडण्याची ज्यांची क्षमता असेल त्यांनाही प्रशिक्षण साहाय्य प्रदान केले जाईल.

| | |
|---|---|
| NIFTEM and IIFPT at National Level<br>Training to Trainers | राष्ट्रीय स्तरावर एँनआयएफटीईएँम आणि आयआयएफपीटी<br>प्रशिक्षार्थ्यांना प्रशिक्षण |
| Training to RPs | संसाधन व्यक्तींना प्रशिक्षण |
| Cluster Level<br>Training to Enterprise<br>Training to Groups | क्लस्टर स्तर<br>एँण्टरप्राईजना प्रशिक्षण<br>गटांना प्रशिक्षण |

9.2 राष्ट्रीय अन्न प्रौद्योगिक उद्योग आणि व्यवस्थापन (एनआयएफटीईएम) आणि भारतीय अन्न तंत्रज्ञान प्रद्यौगिकी संस्थान (आयआयएफपीटी), एमओएफपीआयच्या अंतर्गत दोन राष्ट्रीय अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान संस्थाना क्षमता निर्माण व संशोधनासाठी जबाबदारी दिलेली आहे. राज्य स्तरावर, क्षमता निर्माण आणि प्रशिक्षणसाठी राज्य सरकारद्वारे निवड केलेल्या अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान राज्य स्तरीय प्रौद्यागिक संस्थेमध्ये भागीदारी करेल.

9.3 लाभार्थी व गट लाभार्थ्यांना प्रशिक्षण देऊन उद्योग विकास, उद्योजकांच्या कार्यपध्दतीचे आवश्यक कार्ये, बुक किपींग, नोंदणीकरण, एफएसएसएआय मानके, उद्योग आधार, जीएसटी नोंदणीकरण, सामान्य स्वच्छता, पॅकेजिंग, विपणन इत्यादी बाबींवर लक्ष्य ठेवले जाईल. ओडीओपीच्या मॉडेलवर विशिष्ट प्रशिक्षणाचा आराखडा तयार करणे आणि उद्योजकाच्या जवळील कार्यक्षेत्रात व्हर्टिकल लक्ष्य असलेले उत्पादने घेण्यात येईल. ग्रामीण स्वयं रोजगार प्रशिक्षण संस्थेची (आरएसईटीआय) विद्यमान साधन सुविधा आणि अन्य संस्थाना जिल्हा पातळीवर प्रशिक्षण देण्यासाठी वापर केला जाईल.

## 10. भागीदारी संस्था

10.1 योजनेत एससीस/एसटीस, महिला आणि महत्वकांक्षी असलेले जिल्हे आणि एफपीओस, एएचजीएस आणि सहाकरी उत्पादकांवर विशेष लक्ष्य आहे. ग्रामीण विकास मंत्रालय अंतर्गत टीआरआयएफइडी, राष्ट्रीय अनुसूचीत जमाती विकास वित्त निगम, एनसीडीसी, लघु कृपी व्यवसाय संघ (एसएफएसी) आणि राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मिशन या क्षेत्रात काम करतात. युनिट्स/एससीस, एसटीस, सहकारी, एफपीओसस आणि एसएचजीएस क्लस्टरांची अनुक्रमे ओळख करून साहाय्यता करणे आणि राज्य पीआयपीत प्रस्ताव देण्याचे कार्य उपरोलिखित संस्था ही एकत्रितरित्या करू शकते.

## 11. अंमलबजावणी आणि देखरेख यंत्रणा

11.1 केंद्र, राज्य आणि जिल्हा पातळीवर योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि देखरेख होण्यासाठी खालील व्यवस्थापकीय संरचना असेल:

| English | Marathi |
|---|---|
| Committee on Capacity Building & Research | क्षमता निर्माण आणि संशोधन समिती |
| National Apex Institutions NIFTEM/IIFPT etc | राष्ट्रीय सर्वोच्च संस्था एनआयएफटीईएम/आयआयएफपीटी इत्यादी. |
| State Level Technical Institutions | राज्य स्तरीय तांत्रिक संस्था |
| Inter-Ministerial Committee (IMEC) | आंतर मंत्रालयीन समिती (आयएमईसी) |
| Project Executive Committee (PEC) | प्रकल्प कार्यकारी समिती (पीईसी) |
| State Level Approval Committee (SLAC)<br>State Nodal Department | राज्य स्तरीय मंजुरी समिती (एसएलएसी)<br>राज्य नोडल विभाग |
| State Level Approval Committe | राज्य स्तरीय मंजुरी समिती |
| State Nodal Department Agency | राज्य नोडल विभाग एजन्सी |

| | |
|---|---|
| District Level Committee | जिल्हा पातळी समिती |
| National Programme Management Unit (NPMU) | राष्ट्रीय कार्यक्रम व्यवस्थापन युनिट (एनपीएमयू) |
| State Programme Management Unit (SPMU) | राज्य कार्यक्रम व्यवस्थापन युनिट (एसपीएमयू) |
| Resource Person (RP) | संसाधन व्यक्ती (आरपी) |

11.2 **आंतर मंत्रालयीन सशक्त समिती (आयएमईसी):** केंद्रीय स्तरावर असलेल्या आयएमईसी, सामान्य अधिक्षण, मार्गदर्शन आणि योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी एकूण दिशा, प्रगतीची देखरेख आणि कामागिरीचा आढावा घेण्यासाठी प्रक्रिया उद्योग (एमओएफपीआय) अध्यक्षस्थानी असेल. योजनेची मार्गदर्शक तत्त्वे, योजने अंतर्गत राज्य आणि केंद्रशासित प्रदेश यांचे प्रकल्प अंमलबजावणी प्लान (पीआयपी) आणि एसएचजीस/एफपीओस/सहाकार, सामान्य साधन सुविधांचे भांडवल गुंतवणूकीचे विविध प्रकल्प व विपणन आणि ब्रँण्डिंगसाठी रू.10 लाखच्या वर असलेल्या प्रकल्पाच्या प्रस्तावांना आयएमईसी मान्यता देईल. कार्यपातळीवर योजनेचे प्रशासनिक कार्य आणि नियमित देखरेख करण्यासाठी प्रकल्प कार्यकारी समितीची (पीईसी) एमओएफपीआयमध्ये स्थापना केली जाईल. सचिवालयी, व्यवस्थापकीय आणि अंमलबजावणी साहाय्य प्रदान करण्यासाठी राष्ट्रीय कार्यक्रम व्यवस्थापन युनिट (एनपीएमयु) एमओएपीआयला साहाय्य करण्यास स्थापित केली जाईल.

11.3 **राज्य स्तरः** या योजनेच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी राज्य सरकार नोडल विभाग आणि राज्य नोडल अधिकारी नियुक्त करेल. राज्य नोडल एजन्सी (एसएनए) राज्य पीएमयुच्या सहाय्याने सदर योजनेची अंमलबजावणी करेल. राज्यस्तरीय मान्यता समिती मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली या योजनेच्या अंमलबजावणीचे निरीक्षण करेल. समिती योजनेच्या अंमलबजावणीच्या संबंधित विविध कार्यावर रू.10 लाख पर्यंतचा खर्च मंजूर करेल. जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय समिती (डीएलसी) स्थापन केली जाईल.

11.5 लाभार्थ्यांना हॅण्डहोल्डिंग साहाय्य देण्यासाठी जिल्हा संसाधन व्यक्तीची (डीआरपीएस) नियुक्ती केली जाईल. डीपीआर तयार करणे, बँक कर्ज घेणे, आवश्यक नोंदणीकरण आणि एफएसएसएआय मानक अन्नाचा समावेश असलेल्या परवान्याचे साहाय्य प्राप्त करणे, उद्योग आधार, जीएसटी इत्यादींना हॅण्डहोल्डिंग साहाय्य करेल.

## 12. अभ्यास आणि अहवाल

12.1 राज्य सकराकने खालील अभ्यास घेतले पाहिजेत:

(i) **मुलाधार मूल्यनिर्धारण**: ओडोओपी ओळखण्यासाठी मूलाधार असलेला अभ्यास घेतला पाहिजे. प्रत्येक राज्याने सदर अभ्यासाचा निष्कर्ष हा 31 जुलै 2020 पर्यंत काढला पाहिजे. या अभ्यासासाठी रू.2.5-10.0 लाखापर्यंतची रक्कम राज्यांना देण्यात येईल.

(ii) **राज्य स्तरीय विस्तार नियोजन (एसएलयुपी):** ओडीपीवर एकदा निर्णय घेतला गेला की जिल्हात त्या उत्पादनाची प्रक्रिया करणाऱ्या युनिटसची संख्या, शेतीच्या पातळीची कार्यपध्दती, उत्पादनांचे एकूण प्रमाण आणि मूल्य, तंत्रज्ञान, फार्म गेट पातळी प्रक्रिया, साठा, कोठार इत्यादींचा राज्यांमध्ये तपशीलवार अभ्यास केला पाहिजे. सदर अभ्यासाचा निष्कर्ष हा 31 डिसेंबर 2020 पर्यंत काढला पाहिजे. वरील अभ्यासासाठी रू.25.0-75.0 लाखापर्यंतची रक्कम राज्यांना देण्यात येईल.

## 13. सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे

mofpi.nic.in या मंत्रालयाच्या संकेतस्थळावर योजनेची तपशीवार मार्गदर्शक तत्त्वे पाहु शकता.

**अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय**

**भारत सरकार**

**आम्हाला फोलो कराः एमओएफपीआय इंडिया फेसबुक, एमओएफपीआय_गोओआय ट्वीटर**